सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाकुंभाचे शेवटचे अमृत स्नान १.२५ कोटी लोकांनी केले स्नान

विदर्भ प्रजासत्ताक दि.३प्रयागराज

आज वसंत पंचमीला महाकुंभातील तिसरे आणि शेवटचे अमृत स्नान सुरू आहे. हातात तलवार-गदा, डमरू आणि शंख. अंगावर राख. डोळ्यावर काळा चष्मा. घोडा आणि रथाची सवारी. हर हर महादेवचा जयजयकार करत, संत आणि ऋषी स्नानासाठी संगमावर पोहोचत आहेत.



सर्वप्रथम, पंचायती निरंजनी आखाड्याचे संत संगमात पोहोचले. त्यानंतर किन्नर आखाड्याने सर्वात मोठ्या जुना आखाड्यासह अमृत स्नान केले. आतापर्यंत, १३ पैकी १० आखाड्यांनी स्नान केले आहे.

संतांचे आशीर्वाद घेण्यासाठी लाखो भाविक संगम येथे येतात. लोक नागा साधूंच्या पायाची धूळ त्यांच्या कपाळावर लावत आहेत. अमृत स्नान पाहण्यासाठी २० हून अधिक देशांतील लोक संगमला पोहोचले आहेत. हेलिकॉप्टरमधून संगमवर २० क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला.

संगमाकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर १० किमीपर्यंत भाविकांची मिरवणूक आहे. प्रयागराज जंक्शनपासून ८ ते १० किमी चालत लोक संगमला पोहोचतात. गर्दी पाहून हनुमान मंदिर बंद करण्यात आले. जत्रा परिसरातील सर्व रस्ते एकेरी आहेत.महाकुंभमेळ्यात ६० हजारांहून अधिक सैनिक तैनात आहेत. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी १०० हून अधिक नवीन खझड देखील तैनात करण्यात आले आहेत. हेलिकॉप्टरमधून गर्दीवर नजर ठेवण्यात येत आहे. २७५० सीसीटीव्हीही बसवण्यात आले आहेत. लखनऊमध्ये मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी नियंत्रण कक्ष तयार करण्यात आला आहे. योगी स्वतः डीजीपी, प्रधान सचिव गृह आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पहाटे ३ वाजल्यापासून देखरेख करत आहेत.

वसंत पंचमीला पहाटे ४ वाजेपर्यंत १६.५८ लाख भाविकांनी स्नान केले. महाकुंभाचा आज २२ वा दिवस आहे. १३ जानेवारीपासून आतापर्यंत ३४.९७ कोटींहून अधिक लोकांनी डुबकी घेतली आहे. आज ३ ते ४ कोटी भाविक संगमात स्नान करू शकतील असा प्रशासनाचा अंदाज आहे.

### चेंगराचेंगरी प्रकरणाची सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## कल्याणकारी योजना बंद होणार नाहीत पंतप्रधानांनी दिला 'मोदी गॅरंटी'वर जोर

विदर्भ प्रजासत्ताक दि.३नवी दिल्ली

केंद्रातील भाजप सरकार गरीब, शेतकरी, युवक व महिला या चार स्तंभांना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. केंद्र सरकाराचा अर्थसंकल्प हा मोदींची गॅरंटी पूर्ण करण्याची गॅरंटी असल्याचा दावा रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला. बजेटमधील विविध तरतुदींचा उल्लेख करत भारताच्या स्वतंत्र्यानंतर कधीच १२ लाख रुपये उत्पन्न असणाऱ्यांना करातून दिलासा मिळाला नसल्याचा दावा करतानाच दिल्लीतील सत्ताधारी आपला मोदींनी लक्ष्य केले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित एका प्रचार सभेला संबोधित करताना ते बोलत होते.



दिल्लीतील सत्ताधारी आपच्या खोट्या आश्वासनामुळे व धोरणामुळे कारखाने बंद होत आहेत. ज्या लोकांनी जनतेची लूट केली त्यांना हिशेब द्यावा लागेल. खोट्या आश्वासनासोबत आपत्ती उभी आहे, तर दुसऱ्या बाजूंना मोदींची गॅरंटी आहे. त्यामुळे लोकांनी भाजपला निवडून देण्याचा निश्चिय केला आहे. आपत्तीने राष्ट्रीय राजधानीचे ११ वर्षे वाया घालवल्याचा दावा मोदींनी केला.

दिल्लीत भाजपची सत्ता आल्यास सर्व योजना बंद केल्या जातील हा आपचा आरोप फेटाळून लावताना दिल्लीतील एकाही झोपडीला सरकार हात लावणार नसल्याचा दावा मोदींनी केला. दिल्लीतील नागरिकांसाठी सुरू असलेली कोणतीही कल्याणकारी योजना बंद केली जाणार नाही.

८ फेब्रुवारीला दिल्लीत भाजप सरकार स्थापन करणार असून ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महिलांना २५०० हजार रुपये मिळायला सुरुवात होईल. केंद्रात तिसऱ्यांदा भाजपचे सरकार येण्यासाठी महिलांनी महत्त्वाचे योगदान दिले असल्याचे मोदींनी नमूद केले.

## कर्नाटकात सन्मानाने मरणाचा कायदा लागू, देशातील पहिलेच राज्य

विदर्भ प्रजासत्ताक दि.३बंगलेरू

आपल्या ऐतिहासिक निर्णयात कर्नाटक सरकारने राज्यात सन्मानाने मरण्याचा अधिकार लागू केला आहे. सुप्रीम कोर्टाच्या जानेवारी २०२३ च्या निर्णयानुसार, हा अधिकार अशा रूग्णांना देण्यात आला आहे ज्यांना बरे होण्याची आशा नाही आणि त्यांना जीवनरक्षक उपचार सुरू ठेवायचे नाहीत. टाईम्स ऑफ इंडियाच्या ढजख च्या अहवालानुसार, कर्नाटक हे असे करणारे देशातील पहिले राज्य बनले आहे.




### राईट टू डाय विथ डिग्निटी कायदा काय आहे?

एखाद्या गंभीर आणि असाध्य आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णाला जीवरक्षक उपचार चालू ठेवायचे नसल्यास, रुग्णालये आणि डॉक्टरांनी रुग्णाच्या निर्णयाचा आदर करणे बंधनकारक आहे. अशी प्रकरणे प्रमाणित करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी (ऊक्ज) दुय्यम मंडळावर न्यूरोलॉजिस्ट, न्यूरो सर्जन, सर्जन, भूलतज्ज्ञ किंवा इंटेन्सिव्हिस्टची नियुक्ती करतील. या मंडळाच्या निर्णयानंतरच रुग्णाला सन्मानाने मरण्याचा अधिकार मिळणार आहे.

### हा कायदा इच्छामरणापेक्षा किती वेगळा आहे?

सन्मानाने मरण्याचा अधिकार आणि इच्छामरण यांचा संबंध आहे, पण समान नाही. मृत्यूचा अधिकार एखाद्या व्यक्तीला त्याच्या आयुष्याच्या शेवटी सन्मानाने उपचार चालू ठेवायचे की नाही हे ठरवण्याचा अधिकार देतो. इच्छामरण म्हणजे एखाद्या गंभीर आजारी किंवा पीडित व्यक्तीचे आयुष्य इंजेक्शनसारख्या साधनाने संपवणे, जेणेकरून त्याच्या वेदना संपवता येतील. कायदेशीरदृष्ट्या, इच्छामरण हे भारतात बेकायदेशीर आणि गुन्हा आहे. २०१८ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने हा एक घटनात्मक अधिकार मानला, जो कलम २१ अंतर्गत येतो.

### हे कोणी आधीच ठरवू शकेल का?

कर्नाटकच्या कायद्यानुसार, कोणताही रुग्ण कोमात गेल्यास किंवा भविष्यात असाध्य स्थितीत गेल्यास त्याला लाईफ सपोर्ट उपकरणे न ठेवण्याचा निर्णय आधीच घेता येतो. त्यासाठी जेव्हा जेव्हा अशी परिस्थिती उद्भवेल तेव्हा त्यांना शांततेने आणि सन्मानाने मरण्यासाठी मदत करावी, असे लेखी द्यावे लागेल. वैद्यकीय सेवेशी संबंधित कायदेशीर दस्तऐवज, लिव्हिंग विलमध्ये रुग्ण यासाठी संमती देऊ शकतात.कर्नाटकच्या या निर्णयानंतर आणखी अनेक राज्येही पुढे येऊ शकतात. महाराष्ट्र, गोवा आणि केरळमध्येही असे कायदे करण्याचे नियोजन सुरू आहे. दरम्यान, केंद्र सरकारने या दिशेने केंद्रीय मार्गदर्शक तत्त्वे, राष्ट्रीय धोरण किंवा कायदा आणल्यास सर्व राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी करणे सोपे होईल.

## वर्षा बंगला, काळी जादू अन् टोपलीभर लिंबू..; महाराष्ट्रात अंधश्रद्धेचं 'राजकारण'

विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई

महाराष्ट्रात सध्या अंधश्रद्धेच्या राजकारणाने जोर धरला आहे. संजय राऊतानी केलेले विधान आणि त्यावर रामदास कदमांनी केलेला पलटवार यावरून चर्चेला उधाण आले आहे. राज्यात नवं सरकार येऊन २ महिने झाले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्षा बंगल्यावर राहायला गेलेत असा सवाल करत संजय राऊतांनी काही प्रश्न उपस्थित केले. त्यावर रामदास कदमांनी उत्तर दिले.

रामदास कदम म्हणाले की, ज्यावेळी उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपद सोडून वर्षा बंगला सोडला तेव्हा तिथे टोपलीभर लिंबू सापडले असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं होते. काळी जादू काय ते राऊतांनी उद्धव ठाकरेंना विचारायला पाहिजे, काळी जादू काय त्यांना अधिक माहिती, कारण त्याचा अनुभव संजय राऊतांना जास्त असेल म्हणून त्यांच्या डोक्यात काळी जादूचं आलं असावं असा पलटवार रामदास कदमांनी केला.




रामदास कदमांच्या या उत्तरावर राऊतांनीही टोला लगावला. रामदास कदम हे काय स्वामी नाहीत त्यांचं ऐकायला, मुळात काळ्या जादूविषयी कुणी बोलायचे...ही अंधश्रद्धा आहे. जर असं कुणी बोलत असेल तर त्यांच्याविरोधात अंधश्रद्धा निर्मुलन समितीने बोलायला हवं. देवेंद्र फडणवीस अजून वर्षा बंगल्यावर राहायला का जात नाहीत. याचे उत्तर रामदास कदमांनी द्यावे किंवा एकनाथ शिंदे, भाजपा प्रवक्त्याने द्यावी असं संजय राऊतांनी म्हटलं.

### 'वर्षा' बंगल्यात काय घडवलंय?

त्याशिवाय देवेंद्र फडणवीस आणि त्यांचं कुटुंब वर्षा बंगल्यावर राहायला जायला का घाबरतायेत हा साधा प्रश्न आहे. तिथे मिरच्या, लिंबू आहेत असं मी काही म्हटलं नाही. वर्षा बंगला हा मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान आहे. फडणवीस अद्याप बंगल्यात गेले नाही. रात्री तिथे झोपायला जात नाही. तुम्ही कसला भीताय?. तिथे काय घडलंय किंवा याआधी घडवलंय हा महाराष्ट्रातील जनतेसाठी चिंतेचा आणि संशोधनाचा विषय आहे असंही संजय राऊतांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्रीपद आणि वर्षा बंगला ही पत आहे. मुख्यमंत्री म्हणून वर्षा बंगल्यावर जावं असं प्रत्येकाचं स्वप्न असते. परंतु पहिल्यांदाच असं पाहायला मिळतंय. देवेंद्र फडणवीस वर्षा बंगल्यात पाय ठेवत नाहीत. अमृता वहिनींना तिथे जावं वाटत नाही. हे काय चाललंय, अनामिक भीतीमुळे मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान बदलायचं चाललंय, हा बंगला पाडून नवीन बांधण्याचा ठरवला आहे. खोदकाम करून पुन्हा नवीन बांधला जाणार आहे अशी माहिती माझ्याकडे आहे असा दावाही संजय राऊतांनी केला.

## 'मेक इन इंडिया' चांगली कल्पना, पंतप्रधानांनी प्रयत्न केले पण..; राहुल गांधींचे लोकसभेतून टीकास्त्र

विदर्भ प्रजासत्ताक दि.३नवी दिल्ली

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज(३ फेब्रुवारी) तिसरा दिवस आहे. आजपासून राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर चर्चा सुरू आहे. यावेळी काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील 'मेक इन इंडिया' आणि एकंदरीत उत्पादन क्षेत्रावर निशाणा साधला. देशातील उत्पादन ६० वर्षातील सर्वात खालच्या पातळीवर असल्याची टीका राहुल यांनी केली.



### 'मेक इन इंडिया' चांगली कल्पना

यावेळी राहुल गांधी म्हणाले की, 'राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबाबत नवीन काहीच नाही. यात बेरोजगारीचा उल्लेख नाही. यूपीए किंवा एनडीएने तरुणांच्या रोजगाराच्या प्रश्नावर स्पष्ट उत्तर दिले नाही. मेक इन इंडियाबद्दल पंतप्रधान जे बोलले ते चांगलेच आहे. पण उत्पादनात अपयश येत आहे. आम्ही पंतप्रधानांना दोष देत नाही, पंतप्रधानांनी प्रयत्न केला, कल्पना योग्य होती पण ते अपयशी ठरत आहेत.'

मेक इन इंडियाचा उल्लेख करत राहुल गांधींनी फोन दाखवला अन् म्हणाले की, 'हा फोन भारतात बनवला, असे आपण म्हणत असलो तरी, त्याचे पार्ट्स चीनमधून आले आहेत आणि इथे फक्त असेंबल केले आहेत. जग पूर्णपणे बदलत आहे. आपण पेट्रोलियमपासून बॅटरी आणि अणुऊर्जेकडे वाटचाल करत आहोत. सर्व काही बदलत आहे. मागच्या वेळी क्रांती झाली, तेव्हा भारत सरकारने संगणक क्रांती पाहिली होती आणि त्यावर लक्ष केंद्रित केले होते. आज त्याचा परिणाम दिसून येत आहे. संगणक आला की लोक हसायचे. मी वाजपेयीजींचा आदर करतो, पण तेही विरोधात बोलले होते. आज देशातील उत्पादन ६० वर्षांतील सर्वात खालच्या पातळीवर आहे,' अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## दिल्लीत कुणाचं सरकार येणार? काय आहे मतदारांच्या मनात? सी व्होटर्सनं सांगितला जनतेचा मूड

विदर्भ प्रजासत्ताक दि.३नवी दिल्ली

दिल्लीच्या मनात काय? पुढील ५ वर्षांसाठी दिल्लीतील जनता कुणाला सत्तेपर्यंत पोहोचवणार आणि कुणाला विरोधात बसवणार? या प्रश्नाचे उत्तर ८ तारखेला मिळेलच. या निवडणुकीत आम आदमी पक्ष आणि भाजप यांच्यात अगदी चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. तसेच या निवडणुकीत काँग्रेस पक्षही संपूर्ण ताकदीनिशी उतरला होता. दरम्यान सी व्होटरने आपल्या ट्रॅकरच्या सहाय्याने दिल्लीतील जनेतचा मूड जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आपली, सरकार बदलण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न सी व्होटरने दिल्लीतील मतदारांना विचारला असता. १ फेब्रुवारीपर्यंतच्या ट्रॅकरनुसार, या प्रश्नावर उत्तर देताना, विद्यमान सराकारच्या कामावर आपण नाराज आहोत आणि यावेळी बदलाची इच्छा असल्याचे ४३.९ टक्के लोकांनी म्हटले आहे. तसेच, १०.९ टक्के लोकांचे म्हणणे आहे की, ते नाराज आहेत, पण सरकार बदलण्याची इच्छा नाही. तसेच, ३८.३ टक्के लोकांचे म्हणणे आहे की, आपण सरकारच्या कामकाजावर नाराज नाही यामुळे बदलही करू इच्छित नाही. अर्थात, बदल हवा असलेल्या आणि बदल नको असलेल्या लोकांमध्ये फारसे अंतर दिसत नाही.यापूर्वी ६ जानेवारीला एजन्सीने ट्रॅकरचा निकाल घोषित केला होता. तेव्हा ४६.२ टक्के लोकांनी आपण विद्यमान सरकारवर नाराज आहोत आणि बदल आवश्यक असल्याचे म्हटले होते. तसेच, २.७ टक्के लोकांनी, नाराज आहोत, मात्र आणखी एक संधी द्यायला हवी, असे म्हटले होते. तसेच, ४६.९ टक्के लोकांनी, आपण नाराज नाही आणि बदलाची आवश्यकता नाही, असे म्हटले होते.



महत्वाचे म्हणजे, साधारणपणे एका महिन्यात नाराज आणि बदल हवा असणाऱ्या लोकांच्या संख्येत घट झाली आहे. तर नाराज असूनही बदल नको, असे म्हणणाऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. तसेच, बदल नको म्हणणाऱ्यांमध्येही घट झाली आहे.

## सुरेश धसांच्या तक्रारींची दखल अजित पवारांचा धनंजय मुंडेना दणका

विदर्भ प्रजासत्ताक दि.३बीड

भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर केलेल्या गैरव्यवहारांच्या आरोपांची अखेर दखल घेण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी या आरोपांच्या चौकशीसाठी समितीची स्थापना केली आहे. मागील दोन वर्षात प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची चौकशी हे पथक करणार आहे. अवर सचिव सुषमा कांबळी यांच्या आदेशान्वये स्थापन झालेल्या या पथकात तिघांचा समावेश आहे. धाराशिव जिल्ह्यातील सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संतोष भोर हे समितीचे अध्यक्ष. तर अर्थ आणि सांख्यिकी संचालनालय, मुंबईचे अपर संचालक म. का. भांगे आणि जालना जिल्ह्याचे जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सूर्यवंशी हे दोघे सदस्य आहेत.या तीन सदस्यीय पथकाने बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे कामाची प्रशासकीय मान्यता व निधी वितरण याबाबत माहिती मागितली आहे. यावर जिल्हाधिकऱ्यांनी झेडपी सीईओ व नगर पालिकेचे सीओ यांना पत्र व्यवहार केला असून तात्काळ माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.



## संपादकीय ......

# मध्यमवर्गाला भेट

विद्यमान २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ६.४ टक्क्यांपर्यंत मंदावेल, असे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट केले होते. हा गेल्या चार वर्षांतील सर्वात कमी विकास दर राहणार असून, रिझर्व्ह बँकेने अलीकडेच व्यक्त केलेल्या ६.६ टक्क्यांच्या सुधारित अंदाजापेक्षा तो कमी आहे. वाढीचा दर मंदावणार असला, तरी जगातील सर्वाधिक गतीने वाढणारी अर्थव्यवस्था, हे स्थान भारताकडून कायम राखले गेले आहे. चिंतेची बाब म्हणजे, गुंतवणुकीतील वाढ ९ टक्क्यांवरून २०२४-२५ मध्ये ६.५ टक्क्यांपर्यंत घटली. निवडणुकीशी संबंधित अनिश्चिततेमुळे यंदाच्या पहिल्या सहामाहीत सरकारचा भांडवली खर्चही घटला. २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवायचे असल्यास एक किंवा दोन दशके सरासरी आठ टक्के तरी विकास दर गाठावा लागेल. त्याकरिता आर्थिक सुधारणा राबवाव्या लागतील. दरवर्षी ८० लाख लोकांना रोजगार द्यावा, अशा शिफारसी आर्थिक पाहणी अहवालात करण्यात आलेल्या आहेत.

अमेरिका व युरोपात जागतिकीकरणविरोधी वारे वाहत असल्या कारणाने, निर्यात विकासासही मर्यादा पडत आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२५-२०२६चा अर्थसंकल्प मांडला. त्यांचे आतापर्यंतचे हे सर्वात छोटे अर्थसंकल्पीय भाषण होते. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर शेअर बाजारात घसरण दिसून आली. मुख्यतः ताबडतोब व भावनिक प्रतिक्रिया येत असल्यामुळे त्यावरून अर्थव्यवस्थेबद्दलचे निष्कर्ष काढणे चुकीचे. देशातील लोकांची मागणी व उपभोग कमी आहे. त्यामुळे नवीन गुंतवणूक व उत्पादनाचा वेग नरम आहे. याचे कारण, जनतेचे सरासरी उत्पन्न मर्यादित असून, भाववाढीमुळे सरासरी खर्चही कमी आहे. या गोष्टीचा विचार करूनच अर्थसंकल्पात मध्यमवर्गावरील करांचा बोजा कमी करण्यात येऊन, त्यांच्या हातात जास्त पैसा शिल्लक राहील, अशी रास्त व्यवस्था करण्यात आली आहे. एका फटक्यात १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न प्राप्तिकरमुक्त करण्याचे धाडसी व क्रांतिकारक पाऊल टाकण्यात आले. आजपर्यंत कोणत्याही पंतप्रधानांनी वा अर्थमंत्र्यांनी इतकी मोठी सूट दिली नव्हती. ज्या व्यक्ती महिन्याला सरासरी एक लाख रुपये कमावतात, त्यांना एक रुपयाही कर भरावा लागणार नाही. जे नोकरदार वर्षाला १२ लाख रुपये कमावतात, त्यांचा वर्षाला ८० हजार रुपये लाभ होईल. म्हणजे हा अतिरिक्त पैसा बाजारात येईल. मागणी वाढल्याने उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, अशी आशा आहे. हा निर्णय घेण्यामागे अर्थव्यवस्थेला गती देण्याचा हेतू दिसतो. मागणी निर्माण केल्याविना ते शक्य नव्हते. लवकरच नवीन प्राप्तिकर विधेयक मांडले जाणार असून, त्याद्वारे हा कायदा खूप सोपा व सुटसुटीत केला जाण्याचे संकेत आहेत. करदाते जणू गुन्हेगार आहेत अशा पद्धतीने त्यांना वागवले जाणार नाही. ज्यांनी कर भरलेला नाही, तो भरण्यासाठी आणखी मुदत दिली जाणार आहे.वर्षानुवर्षे करदात्यांची व उद्योजकांची सतावणूक होत असून, हे कुठेतरी थांबणे जरुरीचेच होते. अर्थसंकल्पात सूक्ष्म-लघू-मध्यम म्हणजेच एमएसएमई क्षेत्रासाठी पुढील पाच वर्षांत दीड लाख कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज उपलब्ध केले जाणार आहे. क्रेडिट गॅरंटी अंतर्गत या उद्योगांना मिळणारे कर्ज पाच कोटींवरून दहा कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात येईल. प्रस्थापित एमएसएमई निर्यातदारांना तर २० कोटी रुपयांपर्यंतचे मुदत कर्ज मिळणार आहे. तसेच स्टार्टअपसाठीची कर्ज मर्यादा दुपटीने वाढवण्यात आली आहे. देशात ५ कोटी ७० लाख एमएसएमई उद्योग असून, त्यात साडेसात कोटी लोकांना रोजगार मिळाला आहे. आता या रोजगारास आणखी चालना मिळेल. देशात बेरोजगारीची समस्या आहे, हे नाकारण्याचे कारण नाही; परंतु गुणवत्तापूर्ण रोजगार असण्याची गरज आहे. त्यासाठी शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याची जरुरी आहे. त्यादृष्टीने सुधारणा होत असल्याचे ताजे अहवाल दाखवतात. सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठीची टीडीएसची मर्यादा ५० हजार रुपयांवरून एक लाख रुपयांवर नेली आहे. त्यामुळे त्यांच्या हातात व्याजाची पूर्ण रक्कम मिळेल. नॅशनल सेव्हिंग स्कीमवरही सवलत देण्यात आल्याने ज्येष्ठांना मोठाच दिलासा मिळणार आहे. ज्या वर्गाकडे आजवर फारसे लक्ष देण्यात आले नव्हते, त्यांचे हित जपण्याचे पाऊल हे महत्त्वाचेच. पादत्राणे, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वाहन, टीव्ही, वैद्यकीय उपकरणे, पर्सेस, कपडे या गोष्टी स्वस्त करण्याच्या दिशेने उपाययोजना करण्यात आली असून, त्यामुळे या वस्तूंची मागणी वाढणार आहे.

कर्करोगावरील औषधे स्वस्त झाल्यामुळे कर्करोगग्रस्तांवरील आर्थिक बोजा हलका होणार आहे. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाख रुपयांवरून पाच लाख रुपयांवर नेणे योग्य आहे. कारण, शेतकर्यांचा खते, कीटकनाशके, उपकरणे या सर्वांवरचा खर्च वाढलेला आहे. प्रधानमंत्री धनधान्य योजना शंभर जिल्ह्यांत राबवली जाणार असून, त्याचा १ कोटी २० लाख शेतकर्यांना लाभ मिळेल. डाळींमध्ये आत्मनिर्भरता येण्यासाठी सहा वर्षांच्या 'मिशन'ची घोषणा करण्यात आली; परंतु यापूर्वीही डाळींचे उत्पादन घेण्यासाठी उत्तेजन देण्यात आले; मात्र उत्पादनवृद्धीनंतर डाळींची पुरेशी खरेदी करण्यात आली नव्हती व योग्य भावही मिळाले नव्हते. ही चूक पुन्हा होता कामा नये. मच्छीमार व दूध उत्पादक शेतकर्यांना पाच लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्यात येणार असून, त्यामुळे या दोन्ही व्यवसायांना ऊर्जितावस्था येऊ शकेल. बिहारमध्ये 'मखाना बोर्ड' स्थापण्यात येणार असून, त्याचा लाभ शेतकरी व व्यापार्यांना होईल. मिथिलांचलमध्ये पश्चिम कोसी कालवा प्रकल्पासाठी आर्थिक मदत केली जाणार आहे. बिहारमध्ये ऑक्टोबरमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे केंद्राचे त्याकडे विशेष लक्ष दिसते. नवी दिल्लीत विधानसभा निवडणूक असून मध्यमवर्गास अर्थसंकल्पात सवलती देण्याची मागणी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केली होती. गरीब व मध्यमवर्गीयांचा आशीर्वाद मिळावा म्हणून मी देवी लक्ष्मीला प्रार्थना करतो, असे उद्गार मोदी यांनी परवाच काढले होते. आता निर्मलादेवी प्रसन्न झाल्याचा अनुभव किमान मध्यमवर्गीय तरी घेत आहेत.

# कांदा बीजोत्पादनाचे उभे पीक असताना असे करा व्यवस्थापन

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक-**



कांदा हे पीक अतिशय संवेदनशील पीक आहे. हे पीक राज्यातील नाशिक, सोलापूर यासह इतर जिल्ह्यात घेतले जात असल्याने मोठा शेतकरी वर्ग या पिकाशी जोडला गेला आहे. अशात बोगस बियाण्यांचा विक्रीचा प्रकार उघडकीस येत असतो. अशावेळी काही शेतकरी स्वतः बी तयार करण्यावर भर देतात. याच बीजोत्पादन केलेल्या कांद्याचे पीक उभे असताना काळजी घेणे महत्वाचे असते.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

**कांदा बीजोत्पादनाचे उभे पीक**




पुनर्लागवडीनंतर ४० ते ६० दिवसांनी खुरपणी करावी.नत्र खताचा पहिला हप्ता १२ किलो प्रति एकर या प्रमाणात लागवडीनंतर ३० दिवसांनी द्यावा.

नत्र खताचा दुसरा हप्ता १२ किलो प्रति एकर या प्रमाणात लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावा.

पिकास जमिनीचा मगदूर, तापमान यांचा विचार करून १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**पीक संरक्षण-** मॅन्कोझेब २.५ ग्रॅम अधिक प्रोफेनोफॉस १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. यामुळे पानांवरील रोग आणि फुलकिडे यांचे नियंत्रण होईल.

पुढील फवारणी १५ दिवसांच्या अंतराने, हेक्झाकोनॅझोल १ मिली अधिक कार्बोसल्फान १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात करावी.

वरील फवारणीनंतर सुद्धा पानांवरील रोग आणि फुलकिडे यांचे नियंत्रण झाले नाही, तर प्रोपीकोनॅझोल १ ग्रॅम अधिक फिप्रोनील १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास, कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम किंवा थायरम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे द्रावणाची आळवणी करावी.

फुले उमलल्यानंतर बुरशीनाशक किंवा कीटकनाशक यांच्या फवारण्या करू नयेत.

कारण या फवारण्यांमुळे मधमाश्यांना हानी पोहोचते. त्याचा परागीकरणावर विपरीत परिणाम होतो.

**ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी**




## वयानुसार रोज किती मखाने खावे? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

मखान्याला फॉक्स नट किंवा लोटस सीड असेही म्हणतात. मखाना अतिशय आरोग्यदायी आणि पौष्टिक स्नॅक मानला जातो. मखान्यात प्रथिने, फायबर, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते तसेच पचनसंस्थाही निरोगी राहते. मखाना दिसायला हलका असाल तरी पोषक तत्वांनी भरलेला आहे. त्यामुळे मखाना हा लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांसाठी चांगले मानले जाते. तसेच मखान्याचे दररोजचे सेवन शारीरिक समस्या दूर करण्यासाठी फायदेशीर ठरते. पण वयानुसार मखाना किती खावा हे तुम्हाला माहित आहे का?न्यूट्रिशनिस्ट नमामि अग्रवाल म्हणतात की, अनेकजण हलके स्नॅक्स म्हणून मखान्याचे सेवन करतात, परंतु मखान्याचे जास्त सेवन देखील आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. जास्त प्रमाणात खाल्ल्याने पोटाच्या समस्या उद्भवतात. अशावेळी वयानुसार किती मखाने खावेत हे जाणून घेणं गरजेचं आहे.

**३ वर्षाखालील मुलांनी इतक्या प्रमाणात मखाने खावे-** ३ वर्षपेक्षा लहान वयोगटातील मुलांना कमी प्रमाणात मखाना खायला हवा, असे पोषणतज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यांना दररोज ५ मखाने खायला द्यावे. योग्य प्रमाणात मखाने खायला दिल्याने मुलांच्या पचनसंस्थेचा विकास चांगला होतो. तर जास्त प्रमाणात खाल्ल्याने पचनसंस्थेत समस्या उद्भवू शकतात.

**१० वर्षापर्यंतच्या मुलांसाठी**

तुमच्या घरातील १० वर्षांपर्यंतच्या मुलांना तुम्ही दरारोज १५ मखाने खायला देऊ शकता. या वयात मुलांना दररोज १५ मखाने खायला दिल्याने मुलांची पचनसंस्था थोडी मजबूत होते. हे मुलास पोषक द्रव्ये शोषून घेण्यास देखील मदत करतात.

**प्रौढांसाठी-** तुमच्या घरातील प्रौढांना तुम्ही दररोज १५ ते २० ग्रॅम मखाने खायला



देऊ शकतात. मात्र वेगवेगळ्या शरीराच्या स्थितीनुसार त्याचे प्रमाण कमी-अधिक करून द्यावे. यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**मखाने कसे खावे-** तुम्ही मखाने थेट असेही खाऊ शकतात. मात्र मखान्याचा जास्तीत जास्त फायदा शरीराला होण्यासाठी तुम्ही दुधात मखाना उकळून खाऊ शकता. तसेच मध आणि फळांसह देखील मखाने खाल्ले जाऊ शकतात. यामुळे चव आणि पोषण दोन्ही मिळेल.

**मखाना खाण्याचे फायदे-** मखान्यात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात.मखान्यात कमी कॅलरीज असल्याने व फायबर भरपूर प्रमाणात असतं, ज्यामुळे याच्या सेवनाने पोट जास्त काळ भरलेलं राहतं.मखान्यात असलेले फायबर पचनसंस्था सुधारण्यास मदत करते. बद्धकोष्ठतेसाठीही हे फायदेशीर मानले जाते.

( डिस्क्लेमर : या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही.

# विठुरायाचे थेट दर्शन मिळणार, रांगेत उभे राहायची गरज नाही; मंदिर समितीचा कुणासाठी मोठा निर्णय?


विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२पंढरपूर** - पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरात दररोज हजारो भाविक दर्शन घेत असतात. दिवसभर भाविकांची रेलचेल सुरू असते. या गर्दीमुळे विठुरायाच्या दर्शनासाठी भाविकांना अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. परंतु, आता मंदिर समितीने एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार आता विठ्ठलाचे दर्शन थेट घेता येणार आहे. गर्दीत, रांगेत उभे राहण्याची गरज नाही. परंतु, हा निर्णय कुणासाठी घेण्यात आला आहे?ज्यभराच्या अनेक भागातून विवाह झाला की, नवदाम्पत्य विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत असते. मात्र विठ्ठलाच्या दर्शन रांगेत नवदाम्पत्याला अनेक तास रांगेत उभे राहावे लागते. आता या नवीन जोडप्याला विठुरायाच्या दर्शनाला थांबावे लागणार नसून, नवदाम्पत्यासह त्याच्यासोबत आलेल्या तीन लोकांना विठ्ठलाच्या थेट दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. मंदिर समितीच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता विवाह झालेल्या नवदाम्पत्याला रांगेल उभे न राहता सुलभपणे विठ्ठलाचे दर्शन घेता येणार आहे.

**विठुरायाच्या दर्शन वेळेत वाढ**

पंढरपूर शहरातील स्थानिकांसाठी सकाळी सहा ते साडेसहा एवढाच वेळ दर्शनासाठी असायचा. परंतु, आता त्यात बदल करण्यात आला आहे. स्थानिकांना आता सकाळी सहा ते सात आणि रात्री दहा ते साडेदहा या वेळात आता थेट दर्शन दिले जाणार आहे. यासंदर्भातील निर्णयही मंदिर समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच विठुरायाच्या दर्शनासाठी येणारे दिव्यांग आणि चालता न येणारे अतिवृद्ध यांना झटपट दर्शन दिले जाणार आहे. यासाठी व्हील चेअरची व्यवस्था केली जाणार आहे. विठुरायाच्या दर्शन रांगेत मृत्यू झालेल्या भाविकांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत व मृतदेह गावापर्यंत नेण्याचा खर्चही आता मंदिर समिती उचलणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, फेब्रुवारीत होणाऱ्या माघ यात्रेसाठी मंदिर समितीची बैठक झाली.



आषाढी आणि कार्तिकी या महायात्राप्रमाणेच माघी वारीत सुद्धा भाविकांना तशाच सुविधा दिल्या जाणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. तसेच माघ यात्रा काळात ऑनलाइन आणि व्हीआयपी दर्शन हे पूर्णपणे बंद राहणार असल्याची माहिती दिली.

पंढरपूर शहरातील स्थानिकांसाठी सकाळी सहा ते साडेसहा एवढाच वेळ दर्शनासाठी असायचा. परंतु, आता त्यात बदल करण्यात आला आहे. स्थानिकांना आता सकाळी सहा ते सात आणि रात्री दहा ते साडेदहा या वेळात आता थेट दर्शन दिले जाणार आहे. यासंदर्भातील निर्णयही मंदिर समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच विठुरायाच्या दर्शनासाठी येणारे दिव्यांग आणि चालता न येणारे अतिवृद्ध यांना झटपट दर्शन दिले जाणार आहे. यासाठी व्हील चेअरची व्यवस्था केली जाणार आहे. विठुरायाच्या दर्शन रांगेत मृत्यू झालेल्या भाविकांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत व मृतदेह गावापर्यंत नेण्याचा खर्चही आता मंदिर समिती उचलणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, फेब्रुवारीत होणाऱ्या माघ यात्रेसाठी मंदिर समितीची बैठक झाली. आषाढी आणि कार्तिकी या महायात्राप्रमाणेच माघी वारीत सुद्धा भाविकांना तशाच सुविधा दिल्या जाणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले. तसेच माघ यात्रा काळात ऑनलाइन आणि व्हीआयपी दर्शन हे पूर्णपणे बंद राहणार असल्याची माहिती दिली.

# सुपर हायवेवर डिझेल चोरी करणारी टोळी सक्रिय

## दोन ट्रकमधील ६२० लिटर डिझेल चोरी : तुळजाभवानी पेट्रोल पंपवरील घटना

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती-** सुपर हायवेवर ट्रकमधील डिझेल चोरी करणारी टोळी सक्रिय असून शनिवारी रात्री या टोळीतील युवकांनी दोन ट्रकमधील ६२० लिटर डिझेल चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेत पोलिसांनी राम अर्जुन सरोज (वय ३५, रा. उत्तरप्रदेश) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

राम अर्जुन सरोज हे मुंबई येथील आर. आर. ट्रान्सपोर्टमध्ये ट्रक चालक म्हणून काम करतात. २९ जानेवारीला कंपनीचा ट्रक क्र.एम.एच. ४६ सी.एल. ०१९१ घेऊन ते मध्यप्रदेशला गेले होते. त्यानंतर १ फेब्रुवारी ला ट्रक घेऊन तो अमरावती अकोला मार्गाने कलकत्ता जाण्याकरिता निघाला होता.

शनिवारी रात्री ट्रकचा टायर फाटल्यामुळे त्यांनी तुळजाभवानी पेट्रोल पंपावर ट्रक उभा केला आणि ट्रकमध्ये झोपले. रविवारी सकाळी झोपेतून उठल्यानंतर त्यांनीट्रकची पाहणी केली असता डिझेल टॅंकमधून डिझेलखाली पडलेले दिसताच त्यांनी डिझेल चेक केले. यावेळी टॅंकमधील १४० लिटर डिझेल चोरी झालेले दिसले. तेव्हा बाजुला उभा असलेला ट्रक क्र. जी.जे. १२ बी.टी. ९०९० च्या चालकाने ट्रकची टैंक चेक केली असता त्याच्या ट्रकमधून ३८० लिटर डिझेल चोरी झालेले दिसताच त्यांनी बडनेरा ठाण्यात धाव घेतली.

तसेच घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी सुरू केली आहे.

# आमदार उमेश यावलकर यांची अविरत रुग्णसेवा

## तिसऱ्या टप्प्यातील १७ रुग्णांचे डोळ्याचे शस्त्रक्रिया यशस्वी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३वरुड** - आमदार उमेश यावलकर यांच्या पुढाकाराने वरूड-मोर्शी तालुक्यात मोफत आरोग्य सेवा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने तिसऱ्या टप्प्यात उपचारासाठी पाठविण्यात आलेल्या १७ रुग्णांची मोफत डोळ्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे.

तालुक्यातील गरजू रुग्णांसाठी आमदार उमेश यावलकर यांनी स्वनिधीतून रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अल्पावधीतच हजारो रुग्णांना मोफत आरोग्यसेवा मिळात आहे.

विशेषतः वयोवृद्ध नागरिकांची गैरसोय लक्षात घेता, त्यांनी तालुक्यात मोफत आरोग्यसेवा सुरू करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

या सेवेमुळे तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, अधिकाधिक नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# जिल्ह्यातील बारावीचे ३८ हजार तर दहावीचे ३८ हजार विद्यार्थी देणार परीक्षा

## कॉपीमुक्त परिक्षेकरिता शिक्षण मंडळाचा प्रयत्न




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने ११ फेब्रुवारीपासून १२ वींचे तर २१ फेब्रुवारीपासून १० वींच्या शालांत परीक्षेला सुरुवात होणार आहे. जिल्ह्यातून ३६ हजार ०३१ विद्यार्थी १२ वींची तर ३८ हजार २२१ विद्यार्थी १० वींची परीक्षा देणार आहेत. बारावींच्या परीक्षा लवकरच सुरु होणार असल्याने शिक्षण मंडळाच्या वतीनेसुध्दा कॉपीमुक्त परीक्षेसाठी कंबर कसली आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षा मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी दहावी बारावींची परीक्षा लवकरच सुरू होणार असल्याने मंडळाकडून परीक्षकांसोबतच केंद्र संख्या तयार केली आहे. अमरावती जिल्ह्यात २२ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून १२ वींची परीक्षा १३९ केंद्रावर होणार आहे. ३६ हजार ३१ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. तर १९६ केंद्रावर ३८ हजार २२१ विद्यार्थी बारावींची परीक्षा देणार असल्याची माहिती अमरावती विभागीय बोर्डाच्या वतीने देण्यात आली.

दहावी बारावींची परीक्षा म्हटलं की विद्यार्थ्यांच्या मनात एक भीती असते. बोर्डाची परीक्षा आणि परीक्षा केंद्र दिले जाणार म्हणून विद्यार्थीसुध्दा अभ्यासाला लागतात तर दुसरीकडे शिक्षक व शिक्षण मंडळसुध्दा संपूर्ण परीक्षा शांततेत व कॉपीमुक्त पार पडावी म्हणून प्रयत्नरत असते. यंदा बारावींची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरु होत असून अमरावती विभागीय मंडळाकडून करण्यात येणारी तयारी अतिम टप्यात आली आहे. परीक्षकांसह भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. दहावींच्या परीक्षेला १ फेब्रुवारीपासून प्रारंभहोणार आहे. अति विशेष विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत भरता येणार आहे.विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशपूर्व परीक्षेची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, राज्य मंडळास परीक्षांचा निकाल वेळेत लावता यावा, यासाठी या वर्षापासून हा बदल करण्यात आला. केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी भौतीक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून केंद्रावर सीसीटीव्हीचा वॉच राहणार आहे.

# जिल्ह्यातील ११,१२२ उमेदवारांनी दिली एमपीएससीची परीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे रविवारी महाराष्ट्र गट ब अराजपत्रित सेवा एकत्रित पूर्व परीक्षा घेण्यात आली.या परीक्षेत जिल्ह्यातील नोंदणीकृत उमेदवारांपैकी ११ हजार १२२ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थिती नोंदवून परीक्षा दिली. उर्वरित २,११३ उमेदवार अनुपस्थित होते.महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) कडून दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. यावर्षीही एमपीएससीने वयोमर्यादत एक वर्षाची सूट देऊन परीक्षांचे नियोजन केले आहे.त्यानुसार, वयोगटापेक्षा वयोगटातील निर्धारित जास्त उमेदवारांनी महाराष्ट्र गट–ब (अराजपत्रित) सेवा एकत्रित पूर्व परीक्षा २०२४ आणि महाराष्ट्र गट–अ सेवा एकत्रित पूर्व परीक्षा २०२४ साठी अर्ज केले होते. त्या सर्व उमेदवारांना यावर्षी परीक्षेत बसण्याची संधी दिली जात आहे.या संधीचा फायदा घेत परीक्षेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले. रविवारी ग्रुप बी सर्व्हिसेसची एकत्रित पूर्व परीक्षा घेण्यात आली. आणि गट–अ सेवा एकत्रित पूर्व परीक्षा ४ मे रोजी घेण्यात येत आहे. ज्यामध्ये सहायक कक्ष अधिकारी गट ब च्या ५४ पदांसाठी, राज्य कर निरीक्षकाच्या २०९ पदांसाठी, पोलीस उपनिरीक्षकाच्या २१६ पदांसाठी, अशा एकूण ४८० पदांसाठी दोन परीक्षा होतील. या परीक्षेसाठी जिल्ह्यातील १३ हजार २४८ उमेदवारांनी नोंदणी केली.ज्याच्या आधारे निवासी उपजिल्हा दंडाधिकारी अनिल भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील ४४ परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. रविवारी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत झालेल्या परीक्षेत एकूण नोंदणीकृत उमेदवारांपैकी ११,१२२ उमेदवार उपस्थित होते.उर्वरित २,११३ उमेदवार अनुपस्थित राहिले. शहरातील ४४ परीक्षा केंद्रांवर १,२२० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. सर्व परीक्षा केंद्रात परीक्षा शांततेत पार पडली.–

# पोलीस आयुक्तांनी घेतली संस्कृती राऊतच्या कुटुंबाची भेट


## चार दिवसानंतर खुनाचा गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शनिवार ला दुपारी मयत संस्कृती राऊतच्या कुटूंबाची भेट घेऊन पुर्ण प्रकरणाची माहिती घेतली आणि लवकरच आरोपीला अटक करण्याचे आश्वासन कुटूंबीयांना दिले. दरम्यान गाडगेनगर पोलिसांनी या घटनेत चार दिवसानंतर खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरु केला आहे.जिजाऊनगर येथील रहिवाशी संस्कृती संजय राऊत (वय २५) हिचा २८ जानेवारीला राहत्या घरात मृतदेह आढळला होता. पोलिसांनी संस्कृतीच्या गळ्यावरील एक दुपट्टा जप्त केला गळा आवळून संस्कृतीचा मृत्यू होता. शवविच्छेदन अहवालात झाल्याचे स्पष्ट झाले आहे.शनिवारी दुपारी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरु केला आहे. संस्कृतीचे वडील पोलीस खात्यात कार्यरत असून ते खल्लार ठाण्यात ड्युटीवर आहेत. घटनेच्या दिवशी वडील ड्युटीवर होते आणि आई व लहान बहिण बाहेर गेल्या होत्या. रात्री ९ वाजताच्या सुमारस त्या बाहेरून परत आल्यावर त्यांना संस्कृती मृत अवस्थेत दिसली. त्यांनी गाडगेनगर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली होती. शनिवारी दुपारी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी राऊत कुटूंबाची भेट घेऊन पुर्ण प्रकरणाची माहिती घेतली त्यानंतर गाडगेनगर पोलीस, गुन्हेशाखा आणि विशेष पथकातील अधिकाऱ्यांना विशेष सुचना देऊन आरोपीला अटक करण्याचे आदेश दिले. गाडगेनगर पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत शेजाऱ्याचे बयाण घेतले असून संस्कृतीच्या मोबाईलचा डाटा तपासला जात आहे.काही दिवसाआधी एका युवकाने संस्कृतीच्या मोबाईलवर तिला हाय असा मेसेज पाठविला होता. त्या आधारावर तिवसा येथील एका युवकाला गाडगेनगर पोलिसांनी शनिवारी ताब्यात घेऊन दिवसभर त्याची चौकशी केली, अशी माहिती समोर आली आहे.

# मिलिंद बांबल यांच्या आक्रमक आंदोलना मुळे पन्नालालनगर नाला दुरुस्तीला सुरुवात

## आक्रमक नेतृत्व मिलिंद बांबल यांचे नागरिकांनी केले अभिनंदन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती:–** स्थानिक पन्नालालनगर मोठा नाला सुरक्षा भिंती नसल्याने खचला असून नागरिकांचा येण्याजाण्याचा पुलाजवळील पन्नालालनगर शॉर्टकट रस्ता बंद झाला आहे शेकडो नागरिक , महिला , जेष्ठ नागरीक यांना जाण्यायेण्या साठी हाच मुख्य रस्ता आहे हा रस्ता नाल्याच्या बाजूने खचला असून मोठे खड्डे त्याला पडले आहे.या नाल्याच्या सुरक्षभिंत ही बांधण्यात यावी या करिता या प्रभागाचे माजी नगरसेवक व सभापती मिलिंद बांबल यांनी थेट नाल्यात उतरून आंदोलन केले होते.

अखेर त्या आंदोलनाला यश मिळाले असून नाल्याच्या सुरक्षा भिंतीचे काम सुरू करण्यात आले आहे.शहरातील पन्नालाल नगर परिसरातून जाणाऱ्या अंबा नाल्याच्या दोन्ही बाजूने सुरक्षा भिंती नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात नाल्याकाठिल नागरिकांना अक्षरश्या जिव मुठीत घेवून राहावे लागते.

दोन महिन्या अगोदर पन्नालाल नगर पुलाजवळ नाल्याच्या बाजूने असलेला रस्ता पूर्ण खचला असून मोठे खड्डे पडले आहे हे खड्डे तातडीने बुजवावे व दुरुस्ती करावी या मागनीसाठी मनपाला निवेदन दिले होते पन काहीच कार्यवाही झाली नव्हती त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना होउन जीवितहानी होण्या अगोदर दुरुस्ती करावी यासाठी मनपाचे माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी पन्नालाल नगर नाल्यात उतरून आक्रमक आंदोलन केले नाल्यात पाणी अत्यंत खराब असून काही ठिकाणी नाल्यात मोठे खड्डे असल्याने पाण्याच्या अंदाज येत नाही सापांची संख्या नाल्यात खूप आहे

तरी सुद्धा खचलेल्या रस्तामुळे कोणती जीवितहानी होउ नये आणी नागरिकांना त्रास होऊ नये याकरिता माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी स्वतः जीवाची पर्वा न करता नाल्यात उतरून लक्षवेधी आंदोलन केले होते .

माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी सातत्याने आक्रमक आंदोलन करून दुरुस्ती साठी मनपा कडून निधी उपलब्ध करून घेतला.अमरावती शहरातील आणी ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी तत्पर राहणारे नेतृत्व माजी नगरसेवक मिलिंद बांबल यांचे नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले.

# भातकुली, अमरावती तालुका क्रीडा संकुल समितीची सभा इनडोअर, स्विमिंग तलावसह सर्व कामे पूर्ण करा

## आ. रवी राणा यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** भातकुली ४ कोटी व अंजनगाव बारी ४ कोटी तालुका क्रीडा संकुलचे दोन्ही मिळून ९ कोटी रुपयांच्या आरखडा मधून इंडोअर, स्विमिग तलाव, व्यायामशाळा, लायब्ररी, आभासिका, वॉकिग पथ, रानिग पथ, आदी काम पूर्ण करा, असे निर्देश आ. रवि राणा यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. आमदार रवी राणा हे तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष असून त्यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती व भातकुली वअमरावती तालुक्याच्या अंतर्गत अंजनगाव बारी गावातील क्रीडा संकुल समिती सभा झाली. या दोन्ही संकुलाचेकाम पूर्ण करावे असे निर्देश या समितीमध्ये आ. राणा यांनी अधिकाऱ्यांना दिले. अंजनगाव बारी व भातकुली येथीलक्रीडा संकुलाचे काम तातडीने पूर्ण करुन या संकुलाच्या माध्यमातून नागरिकांना, खेळाडूंना सेवा मिळवून देण्यात याव्यात. येथील संकुलाचे काम दर्जेदार करावे असे निर्देश आमदार रवी राणा यांनी दिले.

आ. रवि राणा यांच्या अध्यक्षे खालील झालेल्या बैठकीला तहसीलदार लोखंडे, तहसीलदार येडे, तालुका क्रीडा समितीचे दोन्ही अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अभियंता, भातकुली नगरपंचायत चे मुख्याधिकारी बोरेकर, गिरीश कासट, आमदार रवि राणा यांचे सचिव उमेश ढोणे, युवा स्वाभिमान पार्टीचे विनोद जयस्वाल गणेशदास , गायकवाड, पार्टीचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमनेर येथे शंकरपटाचा थरार...

## आमदार उमेश यावलकर यांची भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** शेतकरी शंकरपट मंडळ, आमनेर यांच्यावतीने पारंपरिक शंकरपट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. दरम्यान मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांनी भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. मंडळाच्या वतीने त्यांचे शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.शंकरपट हा केवळ एक खेळ नसून, तो शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे प्रतीक असल्याचे मत आमदार यावलकर यांनी व्यक्त करून अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागात उत्साह वाढतो तसेच समाजातील एकोपा वृद्धिंगत होतो, असे सांगितले. या भव्य शंकरपट स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी परिसरातील आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# कौडण्यपूर येथे संतपीठ स्थापन करासंतपीठ संघर्ष समितीची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** वैज्ञानिक ज्ञानासोबत अध्यात्मिक ज्ञान तरुणांना मिळणे आवश्यक आहे परंतु आध्यात्मिक ज्ञान संत बाङ्मयद्वारे देणारे पीठ महाराष्ट्रात एकमेव आळंदी येथे आहे. याच धर्तीवर विदर्भामध्ये श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे संतपीठ शासनाने स्थापन करावे, अशी मागणी कौंडण्यपूर संतपीठ संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे. कौंडण्यपूर हे अनादी काळापासून विश्वाला ऊर्जा पुरविणारे केंद्र आहे. या स्थळाने चारही युगामध्ये सात सत्या (स्त्रिया) विश्वाला दिल्या आहे. असा अनंत इतिहास आहे म्हणूनच कौंडण्यपूर येथे संतपिठ शासनाने दिल्यास अनादी काळाच्या इतिहासावर प्रकाश टाकता येईल तरुण मुले मुली कीर्तनकार प्रवचनकार प्रबोधनकार निर्माण होईल.

त्यामुळे देशात सद्भाव शांती निर्माण होण्यास मदत होईल याच अनुषंगाने तिवसा येथे आयोजित एका सभेत संतपीठ संघर्ष समिती स्थापन करण्यात आली.या समितीमध्ये दिनकर हांडे, नरेश डहाके, शेषराव नायसे, चिंतामण मोहेकर, डॉ अरुण हाडे, अशोक धानोरकर, अतुल देशमुख, वामनराव तवर, संजय हांडे, पुरुष- ेत्तम मकेश्वर, गुणवंत तिखे, पुरषोत्तम वानखडे, ऋषिकेश मानमोडे इतर सहयोगी सभासदांचा समावेश आहे. बैठकीला समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तोंगलाबाद येथे पालखी सोहळा व दिंडी स्पर्धेने अवतरणार पंढरी

## ६ व ७ फेब्रुवारीदरम्यान यात्रा महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यातील तोंगलाबाद श्री संतलष्करी हनुमान यांच्या कृपेने श्री संत हनुमान महाराज पुण्यतिथी निमित्त गेल्या ७६ वर्षापासून सुरू असलेला भव्य यात्रा महोत्सव यावर्षी ६ व ७फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला. दरम्यान भागवत सप्ताहाला सुरूवात झाली आहे. यात्रा महोत्सवानिमित्त पालखी सोहळा व दिंडी स्पर्धेने पंढरी अवतरणार आहे.

६ फेब्रुवारी रोजी हभप नीळकंठ महाराज टापरे यांच्या हस्ते होमहवन व दुपारी ३ वाजता माहेरवाशीन सो–हळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी गावलेकींचा भेटवस्तू देऊन सन्मान होणार आहे. संध्याकाळी समाजप्रबोधनकार अविनाश महाराज भारती यांचे विनोदी कीर्तन सोहळा रंगणार आहे. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गणेश महाराज बावस्कार, पवनपाल महाराज वडाळीकर यांचे कीर्तन झाल्यावर सकाळी ११ वाजता 'श्री'ची भव्य पालखी मिरवणूक व शोभायात्रा गावातून निघणार आहे. त्यामध्ये भव्य सांप्रदायिक दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये दोन गटात दानदाते यांच्या सहकार्याने ८५ हजारांच्या बक्षिसाची लयलूट होणार आहे. दुपारी ४ वाजता दहीहंडी व दिंडी स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. याप्रसंगी खासदार बळवंतराव वानखडे व आमदार गजानन लवटे यांची उपस्थिती असणार आहे. तसेच महाप्रसाद गावकरी मंडळी यांच्या सहकार्यान आयोजित करण्यात आला आहे. या भव्य यात्रा महोत्सवाची सांगता श्री सत्यपाल महाराज यांचे शिष्य पवनपाल महाराज वडाळीकर (अकोट) यांच्या सप्तखंजिरी कीर्तनाने होणार आहे.

# नागपुरातील छोट्या मैदानांच्या विकासासाठी राज्य शासनाकडून १५० कोटींचा निधी देणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत खासदार क्रीडा महोत्सवाचा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर-** खासदार क्रीडा महोत्सवाच्या आयोजनातून नागपूर शहराची क्रीडा क्षेत्रातील वाटचाल गतीने सुरू आहे. शहरात ७०० कोटींच्या खर्चातून मानकापूर क्रीडा संकुलाच्या पुनर्निर्माणाद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा येत्या दोन वर्षात उपलब्ध होणार आहेत. स्थानिक खेळाडूंना सरावासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील छोट्या मैदानांचा विकास करण्यात येईल व यासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने १५० कोटींचा निधी देण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

येथील यशवंत स्टेडियमवर आयोजित खासदार क्रीडा महोत्सवाच्या समारोपाचे मुख्य अतिथी म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आमदार प्रवीण दटके, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, महोत्सवाचे संयोजक संदीप जोशी, अर्जुन पुरस्कार प्राप्त दिव्यांग खेळाडू शितल देवी, क्रिकेटपटू मोहित शर्मा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदार क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून नागपूर व विदर्भातील खेळाडूंना मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. ५८ क्रीडा प्रकारात विजेत्यांना १२ हजारांवर पदक



प्रदान करण्यात आली आहे. ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी सांगितले. खासदार सांस्कृतिक महोत्सव व क्रीडा महोत्सवातून विदर्भातील गुणवान कलाकार व खेळाडू पुढे येत आहेत. यातून विदर्भ व नागपूरचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवणारे कलाकार व खेळाडू घडतील. शहरात ऑलिम्पीक सह आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने ७०० कोटींच्या निधीतून मानकापूर विभागीय क्रीडा संकुलाच्या पुनर्निमाणाचे कार्य सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले, गत सात वर्षांपासून खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे, त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधणे व नैतृत्वही घडवणे हा या मागील मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील क्रीडा मैदान्याच्या विकासासाठी यापूर्वी १०० कोटींचा निधी दिला आहे. अजुनही छोट्या मैदानांच्या विकासासाठी राज्य शासना कडून निधी उपलब्ध व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते खेळाडू, प्रशिक्षक आदींना उल्लेखनीय कामगिरीसाठी क्रीडा महर्षी, क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले. शितल देवी आणि मोहित शर्मा यांनीही यावेळी उपस्थितींना मार्गदर्शन केले. खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक संदीप जोशी यांनी प्रास्ताविक केले.

# हळदी कुंकु च्या वाणात महिलांची आरोग्य तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ धारणी-** धकाधकीच्या जीवनात सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या महिला सतत कामकाजात व्यस्त असतात त्या दरम्यान महिला वर्ग आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असल्याने मकरसंक्रांत सणाचे औचित्य साधून धारणी शहरातील गजानन रेसिडेन्सी मध्ये राहणाऱ्या महिलांनी हळदीकुंकू कार्यक्रमामध्ये वानात महिलांची आरोग्य तपासणी करून हळदीकुंकू कार्यक्रम साजरा केला या अनोख्या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे

नवीन वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांति पौराणिक कथेनुसार सुहासिनी मधील

### धारणीतील महिलांचा अनोखा उपक्रम

आदिशक्तीला शरण जाऊन तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण असतो हळदी-कुंकू करणे म्हणजे ब्रह्मांडातील सुप्त आदिशक्तींच्या लहरींना जागृत होण्यासाठी केलेले आवाहन असे मानले जाते त्याच धर्तीवर गुरूवारला धारणीतील गजानन रेसिडेंसी मधील महिलांनी सामूहिक हळदी कुंकवाचे आयोजन केले त्या कार्यक्रमात एक अनोखा उपक्रम म्हणून धकाधकीच्या जीवनामध्ये सतत व्यस्त असणाऱ्या महिला आपल्या आरोग्याकडे कायम दुर्लक्ष करतात त्यामुळे हळदी कुंकू च्या आरोग्य विभागाच्या मदतीने वानाचे गिफ्ट म्हणून महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना निरोगी आरोग्याचे महत्व पटवून दिले त्यासह अनेक आजारा बाबतीतआरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.या अनोख्या उपक्रमासाठी तालुका वैद्यकीय अधिकारी तिलोत्तमा वानखडे यांनी आरोग्य विभागाची चमू उपलब्ध करून दिली होती. त्यामध्ये वैद्यकिय



अधिकारी आशा मुंडे , प्रणाली सोनोने , भारती इंगळे, कल्पना पटेल, भाग्यश्री जाधव यांचा सामावेश होता त्यांनी शेकडो महिलांची आरोग्य तपासणी करून हळदी कुंकू कार्यक्रमाला साद दिलीतर हा अनोखा उपक्रम सौ कल्याणी साबळे, सौ प्रणिता खेरडे, सौ पुनम चौधरी, सौ अर्चना रोकडे, सौ अर्चना शिरभाते, सौ दर्शना कोकाटे सौ रोशनी मालवीय , सौ स्वाती कविटकर या महिलांनी राबविला त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक

## बच्चु कडुंचे तरूणाईसोबत श्रीमान 'रायगड' दर्शन, शिवरायांचे जीवन प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी -बच्चु कडु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ रायगड**

शिवरायांच्या जीवनातील संघर्ष, दूरदृष्टी, व स्वराज्य स्थापनेमागील त्यांची मेहनत यावर बच्चु कडु यांनी युवकांना संबोधित करताना शिवरायांचे जीवन हे प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत आजच्या तरुणाईने शिवरायांच्या स्वाभिमान, कष्ट आणि नेतृत्वाच्या गुणांचा आदर्श घेतला पाहिजे. देश आणि समाजासाठी जबाबदारी स्वीकारण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे विचार माजी राज्यमंत्री बच्चु कडु यांनी हिंदवी परिवार आयोजित हिवाळी मोहीम रायगड परिक्रमा ते तळागड या तीन दिवसीय मोहीमेच्या प्रारंभी युवकांना संबोधीत करताना केले. डॉ शिवरत्न शेटे व दुर्ग अभ्यासक श्रीकांत कासट यांच्या माध्यमातून हजारो युवक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान रायगड परिक्रमा करत सहभागी झाले. माजी राज्यमंत्री बच्चु कडु यांनी युवकांसोबत ऐतिहासिक रायगडावर आयोजित या कार्यक्रमात सहभागी झाले. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचा गौरव करत युवकांना प्रेरणा देणारे प्रबोधन केले.रायगड किल्ल्याला भेट देण्यासाठी महाराष्ट्रभरातून १००० हून अधिक युवक एकत्र आले होते. दौऱ्याची सुरुवात गडाच्या पायथ्याशी शिवरायांच्या चरणी पुष्पांजली अर्पण करून झाली. यानंतर युवकांनी एकत्रितपणे गड चढत त्यानंतर गडावर शिवाजी महाराजांचा सिंहासन आसन असलेल्या जागेचे दर्शन घेण्यात आले. बच्चु कडु यांनी शिवरायांच्या प्रशासनातील



पारदर्शकता, लोकाभिमुखता आणि तटस्थ विचारांची उदाहरणे देऊन युवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी पर्यावरण रक्षण, स्वच्छता, आणि ग्रामीण भागातील युवकांचे सक्षमीकरण,शिवरायांचे त्रिकालाबाधित धोरण, तटरक्षण, स्त्री सन्मान, शिवरायांचे अविश्रांत कार्यप्रणा ली यातून आजच्या तरुणाने एक चांगला आदर्श घेऊन नव महाराष्ट्र निर्माण करावा. शैक्षणिक अडचणी, बेरोजगारी, आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाली. बच्चु कडु यांनी युवकांना सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला देत, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.दौऱ्याच्या शेवटी, गडावर स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. शिवरायांच्या वारसांचा सन्मान राखण्यासाठी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व बच्चु कडु यांनी युवकांच्या समोर मांडले.ही रायगडवारी केवळ ऐतिहासिक स्थळाला भेट देणे नव्हे, तर युवकांच्या मनात स्वराज्य, स्वाभिमान, आणि सामाजिक बांधिलकीचे बीज पेरण्यासाठी प्रभावी ठरली. बच्चु कडुंच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमामुळे युवकांमध्ये नवचैतन्य संचारले असून, शिवरायांच्या आदर्शांवर चालण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.या दौऱ्यामुळे रायगडासारख्या ऐतिहासिक ठिकाणांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले असून, प्रबोधनाच्या माध्यमातून सामाजिक बदलाची नवी दिशा मिळू शकते, हे सिद्ध झाले आहे. यावेळी बच्चु कडु, संजय गोमकाळे, उमेश कपाळे, गणेश उईके, मंगेश लेंडे, आकाश खुरद, मनोज भोजने, स्वप्नील मोहोड, वैभव करडीकर, अभिजीत ठाकरे, विशाल आवारे, विवेक सोसे, देवा कडु, हिंदुराज रोडे, आयुष खापरे, संकल्प अढाऊ, समर्थ धर्माळे व हिंदवी परिवार असंख्य सदस्य सहभागी झाले होते.

# शिरजगाव मोझरी परिसरातील मालधुर शेतशिवारातील विहिरीत आढळला बिबट्या,अफवा अवतरली साक्षात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**शिरजगाव मो.** तिवसा तालुक्यातील मोझरी ते शिरजगाव रस्त्याने मोझरी शेतशिवारलगत बिबट्या दिसल्याची चर्चेला काही दिवसापूर्वी चांगलेच उधान आले होते.दि.८जानेवारी रात्री ८ते ९ दरम्यान अंदाजे अडीच फूट उंच असलेला बिबट्या दिसल्याची चर्चा पसरल्याने शिरजगाव ते मोझरी मार्गाने रोज छोटेमोठे व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.याविषयी वामविभागाला माहिती देऊन वनविभागाने पाहणी करून बिबट असल्याचे कोणतेच ठोस पुरावे न मिळाल्याने परिसरात बिबट्याचा वावर नसल्याचे निष्पन्न झाले.आणि नागरिकांतील बिबट्याची दहशत कमी झाली.परंतु बिबट्याच्या पुनःआगमनाचे वृत्त असे तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी लगत असलेल्या मालधुर येथील अरविंद साबळे यांच्या शेतात तूर कापणी सुरु असतांना मंजूर वर्ग



पाण्यासाठी विहीरवर गेले असता त्यांना विहिरीत बिबट असल्याचे आढळून आले.जिवंत बिबट विहिरीत पाहताच मजुरांनी शेतमालक अरविंद साबळे, सतिश साबळे तथा मोझरीचे सरपंच सुंद्रे भिवगडे कळविले व वनविभागाला प्रचारण करण्यात आले.तिवसा वनविभागातील अमोल चौधरी वनपरिक्षेत्र अधिकारी, एस.घोडमारे वनपाल कु.पायल अंबाडकर वनरक्षक मनोहर वनवे वनमजुर. गजानन राऊत मजुर व रेस्क्यू टिमसह विहिरीत रेस्क्यू करून बिबट्याला बाहेर काढण्यात आले.चांदुर रेल्वे परीक्षेत्र येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले.

# रोहित शर्मा, विराट कोहलीचा नागपूरच्या मैदानावर अंतिम सामना?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नागपूर :** भारतीय संघाचा कणा असलेले रोहित शर्मा आणि विराट कोहली मागील अनेक वर्षांपासून क्रिकेटच्या मैदानात नावलौकिक करीत आहे. भारतीय संघाला क्रिकेटच्या शिखरात पुढे नेण्यात दोन्ही खेळाडूंनी मोलाची भूमिका बजावली. रोहित शर्मा सध्या भारतीय संघाचे कर्णधारपदाची धुरा सांभाळत आहे तर विराट कोहली भारताचा स्टार फलंदाज



आहे. येत्या ६ फेब्रुवारीपासून भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील महत्वपूर्ण तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे. यातील पहिला सामना ६ फेब्रुवारी रोजी नागपूरच्या जामठा मैदानावर होणार आहे. नागपूरच्या मैदानावर भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीचा हा शेवटचा एकदिवसीय सामना होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**अंतिम सामना राहणार-** येत्या एक-दोन वर्षांत नागपूरमध्ये पुन्हा एकही एकदिवसीय सामने होणार नाही. ३८ वर्षीय रोहित आणि ३७ वर्षीय विराटने टी-२० विश्वचषकानंतर टी-२० आंतरराष्ट्रीय स्वरूपातून निवृत्ती घोषणा केली होती.

# आमदार पुत्रासह दोन जणांविरूध्द गुन्हा'ड्राय डे'ला अवैध दारू विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अंजनगाव सुर्जी-** महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'ड्राय डे' पाळला जातो, असे असताना शहरात अवैध देशी दारूची विक्री होव असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घाड घालून देशी, विदेशी दारू बॉटल्स असा एकूण ६,२८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन जणांविरूद्ध गुन्हा नोंदविण्यात आलेला असून यात एका आमदार पुत्राचाही समावेश आहे. विनय लवटे व प्रफुल्ल गजानन गोतमारे (वय ३०, रा. भालदारपुरा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.पोहेकॉ जयसींग गोविंद चव्हाण यांना दारूविक्रीबाबत माहिती मिळाली होती. त्यानुषंगाने पोलीसांनी हॉटेल जिवदानीच्या मागील परिसरात धाड घालून प्रफुल गजानन गोतमारे (वय ३०, रा. भालदारपुरा) हा अवैधरित्या देशी,विदेशी दारूची विक्री करताना आढळला. त्याच्या चौंहताब्यातून ४७ पावट्या देशी दारु (संत्रा), विदेशी मद्याच्या १७ पावट्या व रोख १४५० रूपये, असा एकूण ६२८० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.फौजदार किरण खाडे, हवालदार जयसिंग चव्हाण, शिपाई मोहसिन पठान, अंकुश सयाम यांनी ही कारवाई केली. मद्यपुरवठादार विनय लवटे पसार झाला. हवालदार जयसींग चव्हाण यांच्या तक्रारीवरुन प्रफुल गोतमारे व विनय लवटे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (३), व भारतीय न्यायसंहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# परतवाड्यात ४ ते ९ मार्च दरम्यान शिव महापुराण कथा आणि भव्य सजीव झांकीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अचलपूर,** - परतवाड्यातील नेहरू मैदानात ४ ते ९ मार्च २०२५ दरम्यान संकल्प सेवा समिती आणि सकल सनातनी शिवभक्त यांच्या संयुक्त विद्यमाने शिव महापुराण कथा व भव्य सजीव झांकीचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे कोलकाताच्या जगप्रसिद्ध झांकीद्वारे शिव लीलांचे भव्य दर्शन घडवले जाणार आहे.

शिव महापुराण कथेमध्ये विविध प्रसंग या शिव महापुराण कथेत आचार्य उज्वलजी गर्ग यांच्याकडून शिव तत्वज्ञान, लिंग पूजन, सावन सोमवाराचे महत्व, पंचाक्षर मंत्र महिमा, शिव सती विवाह, वीरभद्र-दक्ष यज्ञ प्रसंग, पार्वती जन्म, गणेश-कर्तिकेय विवाह स्पर्धा, १२ ज्योतिर्लिंग कथा, गंगावतरण, भस्मासूर प्रसंग, महाकाली लीला, शिवनारायण प्रसंग अशा विविध कथांचा सविस्तर विवरण भक्तांना ऐकायला मिळणार आहे.

२५ भव्य सजीव झांक्यांची प्रस्तुती

शिवमहापुराण कथेदरम्यान कोलकाताच्या २५ कलाकारांमार्फत भस्मासूर झांकी, महाकाल भस्म आरती व शृंगार, महाकाली झांकी, गंगावतरण,




शिवजी-विष्णूजी रास, अर्धनारीश्वर झांकी, गणेश-कर्तिकेय विवाह झांकी आदी भव्य झांक्यांचे दर्शन घडवले जाणार आहे.

रामशिला विशेष आकर्षण

शिव महापुराण कथा स्थळी रामेश्वरमच्या पवित्र रामशिला प्रतिष्ठित केली जाणार असून भक्तांना तिचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

रुद्राक्ष वितरण सोहळा

६ दिवस चालणाऱ्या शिव महापुराण कथेत एका दिवशी रुद्राक्ष समारंभ होणार आहे. कथा ऐकणाऱ्या सर्व भक्तांना एक रुद्राक्ष मणी व पूजनासाठी एक मोफत रुद्राक्ष प्रदान करण्यात येईल.संपूर्ण परतवाडा व अचलपूर शहरातील शिवभक्तांनी या भव्य शिव महापुराण कथेस उपस्थित राहावे, असे आवाहन संकल्प सेवा समिती व सकल सनातनी शिवभक्तांकडून करण्यात आले आहे.-

# धारणी पंचायत चॅम्पियन ऑफ चॅम्पियन

## जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव : सांस्कृतिक स्पर्धेत धारणी विजयी तर अमरावती उपविजयी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवात धारणी पंचायत समितीने चॅम्पियन चषक प्राप्त करून मैदान गाजविले. सांस्कृतिक कार्यक्रमातही धारणीने आपले वर्चस्व सिद्ध केले. चार दिवसीय क्रीडा महोत्सवात उपस्थितांना हार-जीत सोबतच आनंदोत्सवचा अनुभव आला. जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी विभागीय क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा रविवारला (ता.२) संपन्न झाला. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचे हस्ते बक्षीस वितरण सोहळा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रीती देशमुख ह्या होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा क्रीडा महोत्सवाचे सचिव बालासाहेब बायस, उपमुख्यकार्यकारी अधिकारी संजय खारकर, विलास मरसाळे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, कृषिविकास अधिकारी मलप्पा तोडकर यांच्यासह सर्व तालुक्यातील गटशिक्षणाधिकारीव विस्तार अधिकारी व क्रीडा संयजोक डॉ. नितीन उंडे, उपसंयोजक पंकज गुल्हाने मंचावर उपस्थित होते. जिल्हा स्तरीय क्रिकेटमध्ये पुरुष विभागात नांदगाव खंडेश्वर विजयी तर तिवसा पंचायत समितीचा संघ उपविजयी ठरला. क्रिकेट मध्ये महिला विभागात चांदूर बाजार विजयी व धामंगावचा संघ उपविजयी झाला. खो खो पुरुष विभागात धारणी विजयी व चिखलदरा उपविजयी झाला. खो खो महिला विभागात दर्यापूर विजयी व नांदगाव उपविजयी झाले. कबड्डी मध्ये पुरुष विभागात धारणी विजयी व चिखलदराचा संघ उपविजयी झाला. कबड्डी महिला विभागात अमरावती विजयी तर चिखलदरा उपविजयी झाला आहे. व्हॉलीबॉल पासिंग पुरुषमध्ये चांदूर बाजार तर महिला मध्ये नांदगाव खंडेश्वरने बाजी मारली. व्हॉलीबॉल स्ट्रोक दर्यापूर ने बाजी मारली. फुटबॉल मध्ये अमरावती येथील मुख्यालयाने बाजी मारली असून धामणगाव पंचायत समितीचा संघ उपविजयी ठरला आहे.

बॅडमिंटन एकेरीमध्ये पुरुष विभागात भातकुली येथील स्वप्नील उपासे विजयी झाले.तर चिखलदरा येथील जीवन गवई उपविजयी झाले.महिला विभागात चांदूर रेल्वे येथील शीतल देशमुख विजयी तर अमरावती येथील विनिता बोरोडे उपविजयी ठरल्या. बॅडमिंटन दुहेरीमध्ये पुरुष विभागात भातकुली येथील सतिश वानखडे, स्वप्नील उपासे विजयी व धारणी येथील डी.तिडके, गोवर्धन बारगजे, उपविजयी झाले. महिला विभागात चांदुर रेल्वे येथील शीतल देशमुख, स्नेहल देशमुख विजयी झाल्या व वनिता बोराडे, उज्वल राऊत उपविजयी झाले. बॅडमिंटन एकेरी ४५ वर्षावरील पुरुष विभागात तिवसा येथील गजानन जाधव विजयी व चिखलदरा येथील जीवन गवई उपविजयी झाले. महिला विभागात चांदुर रेल्वे येथील शीतल देशमुख विजयी व अमरावती येथील उज्वल राऊत उपविजयी झाले. तसेच बॅडमिंटन दुहेरी ४५ वर्षावरील यामध्ये पुरुष विभागात धारणी येथील शरद काळे, संदीप जयस्वाल विजयी व चिखलदरा येथील जीवन गवई, दीपक धोटे उपविजयी झाले. महिला विभागात चांदुर रेल्वे येथील शीतल देशमुख, वैशाली ढाकुलकर विजयी व अमरावती येथील उज्वल राऊत,श्वेता पाटील उपविजयी झाले.टेबल टेनिस एकेरीमध्ये पुरुष विभागात अमरावती येथील उमेश खो विजयी व अचलपुरयेथील नितीन पेढेकर उपविजयी झाले.महिला विभागात अचलपुर येथील अलका चोपडे विजयी व धारणी येथील वैशाली गरकल उपविजयी झाल्या.टेबल टेनिस दुहेरीमध्ये अमरावती येथील उमेश खोडपे,प्रकाश रामटेके विजयी झाले व अचलपुर येथील नितीन पेढेकर,सुरेंद्र वैब उपविजयी झाले.महिला विभागात अचलपुर येथील अलका चोपडे,वैशाली गुडदे विजयी व धारणीयेथील वैशाली गरकल,रेखा वडतकर उपविजयी झाल्या.टेनिक्कॉईट एकेरीमध्ये पुरुष विभागात चांदूर बाजार येथील शहजाद अहमद विजयी व दर्यापूर येथील विनोद जामनिक उपविजयी झाले.महिला विभागात चांदूर बाजार येथील उज्ज्वला वानखडे विजयी व धारणीयेथील वैशाली गरकल,रेखा वडतकर उपविजयी झाल्या.टेनिक्कॉईट दुहेरीमध्ये चांदूर बाजार येथील शहजाद अहमद,मोहम्मद अजीम विजयी व अमरावती येथील डि.मोहोड,राज कुंजेकार उपविजयी झाले.महिला विभागात धारणी येथील शीतल धुर्वे,रेखा वडतकर विजयी व अमरावती येथील सरोज घुटे,विजया सोळंके झाल्या.कॅरम एकेरीमध्ये पुरुष विभागात दर्यापूर येथील डी.श्रीनाथ विजयी व धारणी येथील मोहम्मद शफी उपविजयी झाले.महिला विभागात चिखलदरा येथील सरिता काठोळे विजयी व नांदगाव येथील जया गवईउपविजयी झाले. कॅरम दुहेरीमध्ये पुरुष विभागात दर्यापूर येथील डी.श्रीनाथ,विष्णू राठोड विजयी व धारणी येथील मोहम्मद शफी,शंकर जावरकर उपविजयी झाले.महिला विभागात चांदूर रेल्वे येथील ब्रुकशिल्प वलके, स्नेहल देशमुख विजयी व भातकुली येथील सोनाली ताकपिरे,वैशाली नांदने उपविजयी झाले.तसेच १०० मिटर धावणे मध्ये पुरुष विभागात धारणी येथील गणेश पटेल व दर्यापूर येथील जावेद बेग विजयी व नांदगाव येथील राजू कांबळे उपविजयी झाले.महिला विभागात अचलपूर येथील रेखा भोंड विजयी वधारणी येथील योगिता भुमर उपविजयी झाल्या.२०० मीटर धावणे मध्ये पुरूष विभागात नांदगाव येथील राजू कांबळे विजयी व वरूड येथील रवी इंगळे उपविजयी झाले.महिला विभागात धारणी येथील दिपाली भिलावेकर विजयी व अमरावती येथील मीनल करस्करउपविजयी झाल्या.४०० मीटर धावणे मध्ये पुरुष विभागात धारणी येथील किशोर झाडे विजयी व नांदगाव येथील सीताराम जाधव उपविजयी झाले.महिला विभागात अमरावती येथील मीनल करस्कर विजयी व नांदगाव येथील अर्चना कवाने उपविजयी झाल्या.१५०० मीटर धावणे मध्ये पुरुष विभागात भातकुली येथील गजानन भातकुलकर विजयी व नांदगाव येथील सीताराम जाधव उपविजयी झाले.महिला विभागात चांदूर रेल्वे येथील ब्रुकशिल्प वलके विजयी व धारणी येथील अनिता भिलावेकर उपविजयी झाल्या.४५ वर्षांवरील १०० मीटर धावणे मध्ये पुरुष विभागात धारणी येथील पांडुरंग ढाकणे विजयी तर धामणगाव येथील अजय बावणे उपविजयी झाले.महिला विभागात चांदूर बाजार येथील स्मिता देशमुख विजयी व धामणगाव येथील रंजना मेंढे उपविजयी झाल्या.४५ वर्षांवरील १५०० मीटर धावणे मध्येपुरुष विभागात धारणी येथील पांडुरंग ढाकणे विजयी व धामणगाव येथील अजय बावणे उपविजयी झाले.महिला विभागात नांदगाव येथील अर्चना कव्हाने विजयी व धामणगाव येथील रंजना मेंढे उपविजयी झाल्या.रिले रेस ४-१०० मध्ये धारणी येथील गणेश पटेल,किशोर झाडे,पांडुरंग ढाकणे,सचिन बोंडे विजयी झाले.तर दर्यापूर येथील अनिल रूद्र, डी.सांगळे,प्रफुल्ल घाटोड,जावेद बेग उपविजयीझाले. तसेच स्विमिंग ५० मीटर मध्ये तिवसा येथील दिनेश नगरकर विजयी व मोर्शी येथील रोशन पांडे उपविजयी ठरले.स्विमिंग १०० मीटर मध्ये मोर्शी येथील मोहम्मद कलीम विजयी व धारणी येथील बूनेश धूरवे उपविजयी झाले.स्विमिंग ५० मी (४५ वर्षावरील) मध्ये अमरावती येथील नितीन नवाथे विजयी व नांदगाव येथील राजाभाऊ राजनकर उपविजयीझाले.स्विमिंग १०० मी (४५ वर्षावरील) मध्येअमरावती येथील नितीन नवाथे विजयी व नांदगाव येथील राजाभाऊ राजनकर उपविजयीझाले.बुद्धिबळ मध्ये पुरुष विभागात धारणी येथील हिरालाल रावत विजयी व मोर्शी येथील वसंत आकोलकर उपविजयीझाले.महिला विभागात अंजनगाव सूर्जी येथील रेखा खूपसे विजयी व धामणगाव येथील किशोरी पारेकर उपविजयी झाल्या.



**सांस्कृतिकमध्ये धारणी विजयी तर अमरावती उपविजयी**

सांस्कृतिक कार्यक्रमातही धारणी पंचायत समितीने बाजी मारली असून कराओके गायन प्रकारात अचलपूर प्रथम तर चांदूर बाजार पंचायत समितीने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. हास्यजत्रा या प्रकारात धारणी प्रथम व धामणगाव पंचायत समिती द्वितीय ठरली आहे.एकल नृत्यात मुख्यालय अमरावती प्रथम व तिवसा,अंजनगाव सुर्जीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.समूह नृत्यात वरूड प्रथम व तिवसा द्वितीय ठरले आहे.भावगीत,भक्तीगीत,लोकगीतमध्ये चांदुरबाजार प्रथम व तिवसा द्वितीय ठरले आहे.सिने गीत/युगल गीत मध्ये अमरावती पंचायत समितीने प्रथम क्रमांक प्राप्त केला असूनचांदुर बाजार पंचायत समिती द्वितीय क्रमांकाच्या बक्षिसाची मानकरी ठरली आहे. सांस्कृतिक कार्यक्रम एकत्रित मध्ये धारणी विजयी तर अमरावती उपविजयी ठरली आहे.समारोपीय कार्यक्रमाचे संचालन सुनिता लहाने व शैलेश दहातोंडे यांनी केले.

सांघिक व वैयक्तीक स्पर्धा मध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी,खो-खो, टेनिक्काईट, बॅडमिटन, टेबलटेनिस, कॅरम, बुध्दीबळ, जलतरण, धावणे, भालाफेक, गोळाफेक,थाळीफेक,लांब उडी,उंच उडी या खेळ प्रकारातील सर्व यशवंत महीला व पुरूष खेळाडूंना बक्षीस वितरित करण्यात अशी माहिती क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे,सहसंयोजक पंकज गुल्हाने यांनी दिली. आले. असे प्रसिध्दी समितीचे विनायक लकडे,शकील अहमद, राजेश सावरकर, श्रीनाथ वानखडे यांनी कळविले आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्र नेरपिंगळाई अंतर्गत ग्रामपंचायत लिहिदा येथे 'क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नेरपिंगळाई**

प्राथमिक आरोग्य केंद्र नेरपिंगळाई अंतर्गत ग्रामपंचायत लिहिदा येथे 'क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत' कार्यक्रम घेण्यात आला असून ग्रामपंचायत लिहिदा हि क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत निवडण्यात आली. त्यावेळी तालुका आरोग्य अधिकारी मोर्शी डॉ. जयस्वाल,प्रा.आ. केंद्र नेरपिंगळाईचे वैद्यकीय अधिकारी डॉ.ओसामा शेख, डॉ. आनंद जैन, तालुका क्षयरोग अधिकारी रितेश पुंड, टीबी लॅब टेक्निशियन प्रदीप नानोटे,समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. पूजा वानखडे,आरोग्य सहाय्यक किशोर धानोरकर,आरोग्य सहाय्यक सुरेंद्र थोरात,आरोग्य सेविका,कुमारी छाया नेमाडे,आरोग्य सेवक जितेंद्र पांडे, क्षेत्र कर्मचारी (हत्तीरोग) विकास कुऱ्हाडे,आशा गटप्रवर्तिका थेंमस्कर, आशा कर्मचारी अर्चना तट्टे तसेच लिहिता येतील सरपंच श्री बुरंगे,उपसरपंच,ग्रामसेवक,जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापिका आणि गावकरी मंडळी उपस्थित होते त्यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. पूजा वानखडे यांनी क्षयरोगाबाबत सर्वांना



मार्गदर्शन केले माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या क्षयरोग मुक्त देश हे धोरण २०२५ पर्यंत पूर्णत्वास आणण्याचे ठरविले आहे प्राथमिक आरोग्य केंद्र निरपिंगळे अंतर्गत ११ पैकी पाच ग्रामपंचायत शेरोग मुक्त झाल्या असून राहिलेल्या लवकरच पूर्णत्वास आणण्याचे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र क्षयरोग मुक्त करण्याचे धोरण वैद्यकीय अधिकारी यांनी ठरविले, आणि यासाठी सर्व आरोग्य संबंधित कर्मचारी नव्हे तर गावातील मंडळी यांनी सुद्धा सहकार्य करावे असे सर्वांना आवाहन केले.

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २३ फेब्रुवारीला

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ३ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा एक्केचाळीसावा दीक्षांत समारंभ दि. २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी विद्यापीठ परिसरात संपन्न होत आहे. या समारंभाच्या निमित्ताने पदवीकांक्षी विद्याथ्र्यांना पदवी ससन्मान प्रदान केली जाते. पदवी मिळाल्यानंतर फोटो काढण्याची विद्याथ्र्यांना सोय व्हावी, यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परिसरातच ज्या फोटो स्टुडिओधारकांना पदवीधारकांचे फोटो काढण्यासाठी स्टुडिओ उभारावयाचे असतील, त्यांना नाममात्र १०१/- रूपये शुल्कासह विद्यापीठ परिसरातच विशिष्ट जागा उपलब्ध करून देण्यात येईल, इतर व्यवस्था मात्र संबंधित फोटो स्टुडिओधारकांना करावयाची आहे. ईच्छुक स्टुडिओधारकांनी दि. १७ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत जनसंपर्क अधिकारी यांचेशी जनसंपर्क विभागात संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत.

# शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष .चंद्रशेखर भोयर यांनी शिक्षण मंत्री ना. पंकज भोयर साहेब यांची घेतली भेट...



शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शने च्या बक्षीस वितरण व समारंभास उपस्थित असलेले मान.राज्य मंत्री.ना.डॉ.श्री पंकज भोयर साहेब यांच्या सोबत शासकीय विश्राम गृह अमरावती येथे भेट घेतली व शिक्षक बांधवांच्या विविध समस्या बाबत चर्चा करून मार्गी लावण्यासाठी विनंती केली.या प्रसंगी शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष . श्री पुंडकर साहेब हे देखील उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीस दलातील ११ अधिकाऱ्यांच्या बदल्या : पोलीस अधीक्षकांचे आदेश जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

ग्रामीण पोलीस दलातील नऊ पोलीस निरीक्षक व दोन साहाय्यक पोलीस निरीक्षका यांच्या बदलीचे आदेश शनिवारी १ फेब्रुवारी रोजी अधीक्षक विशाल आनंद यांनी जारी केलेत. त्यानुसार अचलपूर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांची सायबर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली. तसेच सायबर ठाणे सांभाळणारे पोलीस निरीक्षक श्रीराम लांबाडे यांच्याकडे आर्थिक गुन्हे शाखेचा चार्ज देण्यात आला आहे. यापूर्वी श्रीराम लांबाडे हे सायबर व आर्थिक गुन्हे शाखा या दोन्हींचा कार्यभार पाहत होते. बीडीडीएसचे पोलीस निरीक्षक प्रशांत पसराम यांची चिखलदरा येथे बदली करण्यात आली आहे. तर चिखलदराचे ठाणेदार आनंद पिदूरकर यांची बदली पोलीस कल्याण शाखा येथे करण्यात आली. तर नियंत्रण कक्षातील अनिल सिरसाट यांच्याकडे बीडीडीएसचा प्रभार देण्यात आला आहे. तसेच प्रभारी होम डीवायएसपी पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे यांची वरूड येथे बदली करण्यात आली. तर वरूडचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. तसेच चांदूरबाजारचे ठाणेदार सूरज बोंडे यांच्याकडे होम डीवायएसपीचा प्रभार देण्यात आला आहे. तर पोलीस कल्याण शाखा येथील पोलीस निरीक्षक संतोष ताले यांची बदली चांदूरबाजारचे ठाणेदार म्हणून करण्यात आली आहे. त्याचवेळी खल्लारचे साहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ यांची बदली चांदूरबाजार येथे करण्यात आली आहे. तन चांदूरबाजाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बारड यांची बदली खल्लार येथे करण्यात आली आहे.

# दरवर्षी प्रमाणे यंदाही दर्याबद येथे रथसप्तमी महोत्सव महाप्रसाद ने होणार सांगताहजारो भाविकांचे श्रद्धास्थान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेलले पाताळेश्वर मंदिर हे वलगाव ते चांदुर बाजार मार्गावरील दर्याबद गाव येथे आहे हे गाव भातकुली तालुक्यातील असून येथील पाताळशेष नागार्जुन बहुउद्देशीय संस्थेद्वारे मागील ६० वर्षांपासून रथसप्तमी महोत्सव थाटात केल्या जातो.कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने केली जात असून हजारो भाविक याचा लाभ घेतात. पाताळशेष नागार्जुन बहुउद्देशीय संस्थेद्वारे दरवर्षी प्रमाणे यंदाही रथसप्तमी महोत्सव आयोजित केला असून सदर कार्यक्रमाची सुरुवात २८ जानेवारी ला तिर्थस्थापनेने करण्यात आले.२८ जानेवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान आयोजित साप्ताहीक कार्यमाची सुरुवात सकाळी ५ वाजता काकडा आरती ने होत असून दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत ज्यामध्ये महिला भजनी मंडळाद्वारे भजन,संगीतमय भारुड , संगीतमय सुंदरकांड सहित वारकरी कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रमाचा मेळा रात्री १० पर्यंत सुरू असून दर दिवशी हजारो भाविक याचा लाभ घेत आहे.


**रथसप्तमी ला विशेष कार्यक्रम**

दर्याबाद येथील रथसप्तमी महोत्सववाची सांगता ४ फेब्रुवारी ला होत असून ह्या दिवशी सकाळी ९ ते १० बाऱ्या गायन ,१० ते ११ पर्यंत शेषभक्त डिगांबर महाराज व शिवभक्त भीमराव महाराज यांचे प्रतिमा पूजन नंतर ११ ते १ पाताळशेष मूर्ती ची शोभायात्रा व पालकी भ्रमण व तद्रंतर १ ते २ पर्यंत ह भ प अशोकजी महाराज क्षीरसागर (आळंदीकर, विदर्भ भूषण) यांचे द्वारे काल्याचे कीर्तन,गजानन तायडे यांचे हस्ते दहीहंडी नंतर महाप्रसादला सुरुवात होईल तरी आयोजकांद्वारे जास्तीतजास्त भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे त्याच प्रमाणे मंदिर जीर्णोद्धार करीता यथाशक्ती सहयोग करन्याचे ही आवाहन पत्रकाद्वारे केले आहे.

# अस्मिता शाळेतील विद्यार्थ्यांनी जिंकले प्रेक्षकांची मने : चम चम चमको या बालनाट्याने प्रेक्षकांची मने जिंकली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

२१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धामध्ये श्री. धनंजय सरदेशपांडे लिखित आणि श्री.किशोर श्रीरामजी पाचकवडे दिग्दर्शित सिपना इंजिनिअरिंग कॉलेज, अमरावती. येथे प्राथमिक फेरीत सादर झालेल्या चम चम चमको या बालनाट्य ने प्रेक्षकांची मने जिंकली.बालनाट्य ची सुरुवात डान्स कॉम्पिटिशन ने होते ज्यात सायली (कु.अपूर्वा लव्हाटे ) आणि तिची आई उषा (कु. ख़ुशी मळाई ) हया दोघी माय लेकी चमको कॉम्पिटिशन चा राऊंड जिंकून पुढच्या राउंड मध्ये जातात. याचाच तोरा मिरवत उषा हि सुमती (कु. माही शिंदे ) कडे पेढे घेऊन जाते आणि मी आणि माझी मुलगी कशी काय श्रेष्ठ आहोत हे बिंबविण्याचा प्रयत्न करते. ती तिच्या प्रयत्नात सफल होते आणि सुमती आपल्या मुलीला (कु. ख़ुशी पाटील ) ला डान्स, ड्रामा, गायन शिकवीन्या करीता घरीच टिचर बोलावते. पण ईशाला या सगळ्यात रस नसतो तिला मोठे चित्रकार व्हायचे असते, पण सुमती ईशाचे काही एक ऐकून न घेता तिला लोक काय म्हणतील, समाज काय म्हणेल, नातेवाईक काय म्हणेल याचीच चिंता जास्त सतावते. आणि याच कारणाने ईशावर दडपण येऊन डान्स, ड्रामा आणि सिंगिंग टिचर तिला राक्षस /भुतं वाटू लागतात आणि ती त्याचा धसका घेऊन बिमार पडते. त्यात तिची मावशी डॉ. (कु. अनुष्का मेष्कर ) सुमतीला समजावून सांगते कि आई वडिलांचे गुण घेऊनच मुलं जन्माला येतील असे नसते, पण सुमती तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करते. पण डॉ. म्हणून नाही तर एक बहीण आणि ईशाची मावशी म्हणून ती सुमतीला समजविते आणि सुमतीच्या जुन्या आठवणीच्या माध्यमातून तिला सुद्धा नाटक, संगीत, डान्स आवडायचा हे उलगडून घेते, तिच्यातल्या एका चित्रकाराला कसे तिने डांबून ठेवले आहे ते तिच्याच तोंडून वदउन घेते.आणि तेव्हा खुलासा होते त्या कटू आठवणीचा जेव्हा एकदा हुबेहूब एका कॅलेंडरचे चित्र सुमती काढते तिला शाळेतील शिक्षक कलर



बॉक्स भेट म्हणून देतात. ती आनंदाने घरी जाते तर तिला मार पडतो, कारण ते चित्र उत्तान असते पण याचा अर्थ तिला लहान असताना कळत नसतो,पण चित्र वाईट आहे असे सुमतीच्या घरच्यांचे म्हणणे असते. हे वाक्य बोलून सुमती शांत बसून रडते. हे ऐकून डॉ. मावशी तिला सांत्वना देत ईशाला विचारते कि तुला चित्रकार व्हायला आवडेल का? तर ईशा तिला म्हणते कि हो मावशी मला चित्रकार व्हायला आवडेल पण यातून आईला ख़ुशी मिळेल तरच. आणि सुमतीला तिची चूक लक्ष्यात येते आणि ती तिला प्रोत्साहन देते कि हो बेटा हो तु खुप मोठी चित्रकार हो. आणि बालनाट्यचा शेवट खुप गोड होतो. पालक हे का विसरतात कि आपल्या मुलांचे विश्व त्यांचे विचार हे वेळेनुसार प्रगल्भ होतं चालले आहेत. आपण जे नाही करू शकलो, असे म्हणा कि समाजात स्टेटस मान, अपमान, दर्जा दाखविण्याच्या नादात आपण आपल्या पाल्यांचे बालपण हिरावून घेत आहोत. असे कदापी होता कामा नये. कारण आज लता मंगेशकर घरी बसून चूल आणि मुल करत बसल्या असत्या तर आपल्याला एक उत्तम गायिका लाभल्या नसत्या,आपल्या जिल्ह्याच्या महिला राष्ट्रपती सौं. प्रतिभा पाटील नसत्या, माधुरी दिक्षित, सोनाली बेद्रे, उर्मिला मातोंडकर, सुनीता विलीयम, कल्पना चावला अश्या असंख्य व्यक्तिमत्व आहेत ज्या आज आपल्या भारताचे नाव सगळ्या जगात करताय. म्हणून पालकांनी आपल्या पाल्यातील प्रतिभेचा आढावा घेऊन त्याला त्याच्या परीने आयुष्यात पुढे जाण्यास मदत करावी.बाकी बालनाट्यचा प्रयोग अतिशय उत्तम रित्या सादर झालाय. सगळ्या प्रेक्षकांना याचा आनंद घेता आला. यात दिग्दर्शकाची भूमिका चोखदळ रित्या श्री. किशोर श्रीरामजी पाचकवडे यांना खरंच यश प्राप्त झालेय यात शंका काळिमात्र नाही. तसेच सगळ्याच विद्यार्थी यांनी आपआपली भूमिका अत्यंत उत्कृष्ट रित्या पार पडलीत. यात आईच्या भूमिकेत कु माही शिंदे, ईशाच्या भूमिकेत कु. ख़ुशी पाटील, उषाच्या भूमिकेत कु. ख़ुशी मळाई, सायलीच्या भूमिकेत कु. आपूर्वा लव्हाटे, दिग्दर्शकच्या भूमिकेत कु. माही विजयकर, गायकच्या भूमिकेत कु. छंदवी गुजर, नर्तकीच्या भूमिकेत कु. नंदिनी ठाकूर, डॉ. मावशीच्या भूमिकेत कु. अनुष्का मेष्कर, सुप्रियाच्या भूमिकेत कु. धनश्री वाटकर, सुप्रियाची आईच्या भूमिकेत कु. तन्वी यादव, स्वप्नातील भुतं कु. कणक विजयकर, स्वप्नातील भुतं कु.रागिणी गायधणे. या सगळ्या अस्मिता शाळेतील विद्यार्थी यांनी आपआपली भूमिका पार पाडली. तसेच रंगभूषाकार कु. अल्केशा खलोकर तर वेशभूषाकार कु. रिया गुप्ते, संगीत नेहाल गवई,प्रकाशयोजना धिरज वानखडे, नैपथ्य धिरज इंगोले, हर्ष खांडेकर, विशेष आभार सौं. हरदिनी लव्हाळे मॅम मुख्याध्यापिका अस्मिता विद्या मंदिर. सौं. विद्या चौव्हाण मॅम मुख्याध्यापिका अस्मिता हायस्कूल.असेच नाटकाचे यशस्वी प्रयोग निरंतर होत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना. बस नाटक घडत राहो.

# देशाच्या प्रगतीमध्ये उद्योजकांचा महत्त्वाचा वाटा : सुप्रिया बडवे

## मोहिनी, मिलिंद केळकर, प्रभाकर कुलकर्णींना जीवनगौरव पुरस्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३छत्रपती संभाजीनगर**

राष्ट्र व समाज उभारणीत उद्योजकांचे महत्त्वाचे स्थान असून देशाच्या प्रगतीसाठी उद्योजकांनी नवीन तंत्रज्ञानाची देखील कास धरावी, असा सूर ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क ग्लोबलतर्फे रविवारी आयोजित परिषदेत निघाला.

ब्राह्मण समाजाची देशातील सर्वात मोठी सामाजिक संस्था ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क ग्लोबलतर्फे (बीबीएनजी) रवी आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषद 'परिवर्तन' रविवारी एमजीएम संस्थेच्या रुक्मिणी सभागृहात पार पडली. उद्धाटक म्हणून सुप्रिया बडवे या उपस्थित होत्या. बीबीएनजी' चे संस्थापक अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, डॉ. विजय जोशी (सिडनी, ऑस्ट्रेलिया), ज्येष्ठ उद्योजक राम भोगले, विवेक देशपांडे, मुकुंद कुलकर्णी, मुनीश शर्मा, हेरंब कुलकर्णी, शेफाली निधोजकर -भुजबळ, सुशील कुलकर्णी, प्रदीप पेशकार, डॉ. उदय निरगुडकर, ओंकार दाभाडकर, प्रथमेश सखदेव, श्रीपाद देशमुख, अरविंद कोरालकर, सुयोग नरवणे, महेश देशपांडे, डॉ अजय शेषआदींची उपस्थिती होती. परिषदेत एज्युकेशन्, इन्फ्रा स्ट्रक्चर, शासकीय योजना व आर्टिफिशियल इंटेलिजन्सयावर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. परिषद यशस्वी होण्यासाठी 'बीबीएनजी' चे सहयोगी संचालक डॉ. अभिजित चांदे, परिषदेचे कप्तान शैलेश देशपांडे, उपकप्तान गीता आचार्य आणि संयोजन समितीने परिश्रम घेतले.

**उद्यम कौस्तुभ, जीवनगौरव पुरस्कार प्रदान**

परिषदेत उद्यम कौस्तुभ आणि जीवनगौरव या पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावर्षी मिलिंद व मोहिनी केळकर, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्था मुंबईचे प्रभाकर कुलकर्णी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर उद्यम कौस्तुभपुरस्कार आरती सुभेदार, नितीन ढेपे, अरविंद पहुरकर, नीलेश दीक्षित, सुमित तिवारी, ज्योत्स्ना गोडबोले यांना देण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच गोव्याचे माजी लोकायुक्त अंबादास जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# सफाई कर्मचारी धडकले नगरपरिषद कार्यालयावर मुख्याधिकारीच्या दालनाला कुलूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मोर्शी**

मोर्शी नगरपालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहरातील नाली सफाई करणे तसेच नालीचा केर कचरा व शहरात असलेला केरकचरा गोळा करून विल्हेवाट लावण्याचा कंत्राट अमरावती येथील दीपक उत्तरअर्धी यांना अंदाजे तीन कोटी रुपयांचा देण्यात आला आहे. सदर कंत्राटदाराच्यावतीने शहरातील विविध वार्डातील घरगुती कचरा गोळा करणे ट्रॅक्टर द्वारे कचरा डेपोत नेऊन टाकणे, व शहरात असलेल्या नाल्या उपसण्याकरिता जवळपास ३० ते ३५ अस्थाई सफाई कर्मचारी ठेवण्यात आले होते. अस्थयीसफाई कर्मचाऱ्यांना गेल्या दोन महिन्यापासून कामाचा मोबदला न दिल्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरातील कचरा गोळा करणे बंद केले होते. शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे जमा झाले त्यामुळे अस्वच्छता पसरलेली आहे. सोमवार



दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सदर अस्थाई कर्मचारी नगरपालिका कार्यालयावर धडकले असता आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक मुकेश वानखडे व सुशील गुरवे दुपारी एक वाजेपर्यंत कार्यालयात उपस्थित नव्हते. सदर कर्मचाऱ्यांना फोन केला असता त्यांचा भ्रमणध्वनी सुद्धा बंद होता. त्यामुळे संतप्त सफाई कर्मचारी यांनी आपला मोर्चा मुख्याधिकारी च्या दलनात गेले असताना कुलूप लागले होते. त्यानंतर सदर सफाई कर्मचारी प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले यांच्या दालनात सामाजिक कार्यकर्ता निलेश रोडे, माजी नगरसेवक हर्षल चौधरी,नितीन पन्नासे, रवी मोरे, रवी मेटकर, बाबाराव जाधव व अन्य सफाई कर्मचारी महिला कर्मचारी गेले असता दैनंदिन मजुरीची थकित रक्कम मंगळवारी देणार असल्याचे कंत्राटदाराच्या वतीने मोबाईल वर सांगण्यात आले होते. सफाई कर्मचाऱ्यांना अत्यल्प मजुरी देत असल्यामुळे किमान दररोज ५०० रुपये मजुरी देण्यात यावी अशी मागणी सुद्धा सफाई कर्मचाऱ्यांनी केली होती.

**सफाई कंत्राटदार यांची माजी नगरसेवका ला उद्धट वागणूक**

गेल्या दोन ते तीन दिवसापासून अस्थाई सफाई कर्मचाऱ्यांनी कामवन आंदोलन सुरू केले असल्यामुळे शहरात अस्वच्छता पसरली आहे. अस्थाई सफाई कर्मचाऱ्यांसोबत माजी नगरसेवक नितीन पन्नासे नगरपरिषद कार्यालयात गेले असता नितीन पन्नासे यांनी नाली सफाई दीपक उत्तरआर्धी यांना मोबाईलवर संपर्क केला असता सदर कंत्राटदाराने माजी नगरसेवकासोबत उद्धट बोलणे केले.

# म.न.पा अमरावती मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक शौचालय योजना अंतर्गत शौचालय बांधकामासाठी वाढीव अनुदान द्या; प्रहारची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अमरावती महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या वैयक्तिक शौचालय योजना २०२४-२५ अंतर्गत प्राप्त होत असलेले अनुदान पुरेसे नाही. सदर योजना २०१४-१५ मध्ये राबविण्यात आली. तेव्हा त्याचे अनुदान १७ हजार रुपये इतके होते. मात्र, आता १२ हजार रुपये करण्यात आले आहे. त्यामुळे सरकार सामान्य जनतेची थट्टा करीत असल्याचे निदर्शनात येत आहे. आजच्या वाढत्या महागाईच्या काळात १२ हजार रुपये तुटपुंज्या अनुदानावर कोणतेही शौचालय बांधता येत नाही. आज बांधकामाला लागणारे साहित्य महाग झाले आहे. विटा, सिमेंट, वाळू, यासह बांधकामाची इतर साहित्य भाव वाढ झाली आहे.त्यामुळे हे अनुदान वाढवून देण्यात यावे अशी मागणी प्रहार संघटनेचे शहर प्रमुख बंटी रामटेके यांनी केली आहे.

आज प्रहार पक्षाचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृताव शेकडो नागरिक महापालिकेवर धडकले.इतक्या कमी अनुदानात शौचालय बांधकाम होऊ शकत नाही. त्यामुळे आमची निवेदनाच्या माध्यमातून अशी विनंती आहे की, आपण अनुदान न देता आपल्या माध्यमातून शौचालयाचे बांधकाम करून द्यावे. अथवा शौचालय बांधण्यासाठी देण्यात येत असलेले अनुदान वाढवून द्यावे. अन्यथा ही योजना तूर्तास स्थगित करून सामान्य जनतेची होणारी थट्टा थांबवावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा ही यावेळी देण्यात आला.यावेळी बंटी रामटेके महानगर प्रमुख यांच्या सहअभिजीत देशमुख जिल्हाध्यक्ष युवक आघाडीगोलूभाऊ पाटील संपर्क प्रमुखश्यामभाऊ इंगळे संघटक,शेख अकबर भाई जिल्हा महासचिव अभिजीत गोंडाणे,शहर महासचिव शेवराय धुळे, विक्रम जाधव अभिनव नायडेमनिष पवारशहर अध्यक्ष युवक आघाडीयोगेश कावरे,शहरप्रमुख बडनेरा युमेश मेश्राम संपर्क प्रमुख सह अनेक नागरिक ही उपस्थित होते.

# शेंगदाण्याचा भाव दीडशेवर ! फारशी लागवड नाही, आयातीवर असतो अधिक भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

अलीकडे सर्वच वस्तूंवर महागाईची झळ बसत आहे. शेंगदाणा, तसेच शेंगदाणा तेलाचे भाव कमी होण्यापेक्षा अधिक वाढताना दिसून येत आहेत. मात्र, असे असतानाही अत्यंत कमी कालावधीत, कमी मशागत व खर्चात लागवड करता येण्याजोग्या भुईमूग पिकाच्या पेऱ्याबाबत जिल्ह्यातील शेतकरी उदासीन आहेत. जिल्ह्यामध्ये भुईमुगाचा अल्प पेरा आहे. पेरा वाढविण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसून येत नाही.



शेंगदाण्याला दैनंदिन आहारामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेंगदाण्याचा वापर केला जातो. परिणामी, बाजारात शेंगदाण्याला मागणी आहे. शेंगदाणा तेल आवडीने खाल्ला जातो. परंतु, जिल्ह्यात उत्पादन होत नसल्याने आयातीमुळे शेंगदाणाचे भाव वाढलेले असतात. रब्बी हंगामात शेंगदाणा पिकाची लागवड शेतकऱ्यांनाफायदेशिर ठरणारी आहे. कृषी विभागाने त्यासंबंधी नियोजन करुन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे.बरेच पीक काढण्यासाठी नऊ ते दहा महिन्यांचा कालावधी लागतो. मात्र, भुईमूग हे नगदी पीक असून, कमी कलावधीत व खर्चात शेतकऱ्यांना बऱ्यापैकी पैसा मिळतो.जिल्ह्यात मागील वर्षीच्या हंगामापेक्षाही यंदा अत्यल्प पेरा दिसून येत आहे.रब्बीत गहू, हरभरा, लाख-लाखोरी, सोयाबीन व अन्य कडधान्य पीक पिकवण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसतो.

**मावा, बुरशी, अळीची शेतकऱ्यांना मोठी धास्ती**

अनेकदा जमिनीमध्ये भुईमुगाची पेरणी केल्यानंतर पीक उगवणीच्या अवस्थेत असताना, अळीचा प्रादुर्भाव होण्याची भीती आहे, तर शेंगा लागल्यानंतर मावा बुरशी या रोगांमुळे भुईमूग उत्पादकांना नुकसानीला सामोरे जावे लागते.

# सुंदर बसस्थानक; एक कोटीचे बक्षीस : स्वच्छतेवर दिला जाणार विशेष भर

## एसटी महामंडळाची योजना : अंमलबजावणी झाली सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जानेवारीपासून पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यास सुरुवात झाली आहे.

तब्बल यात ३ कोटी रुपयांची बक्षिसे या अभियानांतर्गत देण्यात येणार असून, राज्यात 'अ' वर्गात प्रथम येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात येत



**१ कोटीचे बक्षीस मिळणार**

| वर्ग | बक्षिसाची रक्कम |
|---|---|
| अगट | १ कोटी |
| बगट | ५० लाख |
| क गट | २५ लाख |

आहे. सर्वसामान्य प्रवाशांना स्वच्छ व सुंदर बसस्थानक तसेच निर्जंतुकीकरण, टापटीप प्रसाधनगृहे कायमस्वरूपी उपलब्ध करून देणे हे एसटी महामंडळाचे प्रथम कर्तव्य आहे.सुंदर बसस्थानक योजना मागील वर्षी सुद्धा राबविण्यात आली होती. याला जिल्ह्यातील बसस्थानकांनी अतिशय चांगला प्रतिसाद दर्शविला. यानिमित्ताने बसस्थानकांचा कायापालट होण्यास मोठी मदत झाली.या अभियानात दर ३ महिन्यांनी प्रत्येक बसस्थानकाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यानंतर निवड होईल.विभागातील सर्व बसस्थानकांवर स्वच्छ, सुंदर बसस्थानक' अभियान हे वर्षभर राबविले जाणार आहे.लोकसहभागातून बसस्थानकांचा सर्वांगीण विकास करणे या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

**या सुधारणा कराव्यात**

बसस्थानकांचा परिसर नेहमी स्वच्छ व सुंदर ठेवावा, बसस्थानकावर ये-जा करणाऱ्या प्रवाशांचा स्वच्छता असल्यामुळे एसटी बसच्या प्रवासाकडे कल वाढू शकतो. ही बाब लक्षात घेऊन बक्षीस योजना सुरू केली आहे.

# महाराष्ट्रात लवकरच धर्मांतर विरोधी कायदा, बांगलादेशी, रोहिंग्याना परत पाठवू - नितेश राणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चंद्रपूर**

आम्ही धर्मांतर खपवून घेणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रात लवकरच धर्मांतर विरोधी कायदा आणू, बांगलादेशी व रोहिंग्याचा शोध घेऊन त्यांना परत पाठवू, हिरवा रंग धारण करणाऱ्यां सापानी वळवळ थांबवावी, गो हत्या बंद करा, अन्यथा आम्हाला प्रत्येक वॉर्डातील वराह जयंती साजरी करावी लागेल. त्यासाठी आम्हाला सरकारची परवानगी घ्यावी लागणार नाही. राज्यात हिंदूचे सरकार आहे. सरकार घरी येऊन परवानगी देईल, असा इशारा मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे



यांनी दिला.

गांधी चौक येथे आयोजित हिंदू धर्म सभा मध्ये ते बोलत होते. मंचावर मुरलीधर महाराज होते. याप्रसंगी.राणे यांनी अतिशय कडवट भाषेत बोलताना टीकास्त्र सोडले, राज्यात सर्वत्र हिरव्या सापांची वळवळ सुरू आहे. लव जिहाद प्रकरणातून हिंदू मुलींची फसवणूक सुरू आहे. त्यामुळे वेळेत वळवळ कमी झाली नाही तर प्रत्येकाला आतमध्ये टाकू हे सांगण्यासाठी मी चंद्रपुरात आलो आहे असेही राणे म्हणाले. आम्ही सर्व हिंदू विचाराचे लोक आहोत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कडवट हिंदू मुख्यमंत्री म्हणून सरकारचे नेतृत्व करीत आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे हिंदू सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे प्रतिनिधी म्हणून राज्य सरकारमध्ये आहेत.हिंदू राष्ट्रात पाहिले हिंदूचे हित बघितले व जोपासले जाईल, मग इतरांना बघणार आहे. वणी, पांढरकवडा येथे मोठ्या प्रमाणात गो हत्या सुरू आहेत. गो वंश कायद्याची शंभर टक्के अंबलबाजावणी झालीच पाहिजे ही स्पष्ट भूमिका आहे. येथे शरिया कायदा लागू नाही. तो पाकिस्तान मध्ये लागू आहे. गाईच्या कत्तली खपवून घेणार नाही. गाय ही आपली आई आहे. तेव्हा कायद्याचे पालन करा, हा प्रकार खपवून घेणार नाही. हिरवे साप राज्यपाला पेक्षा मोठे झाले आहे का? हिंदू धर्माकडे वाकड्या नजरेने बघत असाल तर खेर नाही. गो हत्येच्या नावाने मस्ती सुरू आहे ती बंद करा असेही राणे म्हणाले.

# पीडीएमसीची विद्यार्थिनी वैदेही काळे MUHS FIST 25 मध्ये TEER पुरस्काराने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. वैदेही विनय काळे हिने २ फेब्रुवारी २०२५ ला ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (AIIMS) येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), नाशिक तर्फे आयोजित MUHS FIST 2025 आंतरराष्ट्रीय स्तरावरील रिसर्च परिसंवाद, पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत ढएएठ पुरस्कार व द्वितीय पारितोषिक जिंकले आहे. तिचा सत्कार माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर, एम्स डायरेक्टर डॉ. प्रशांत जोशी यांच्या हस्ते झाला. या यशस्वी निवडीबद्दल कुलगुरू लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांनी वैदेहीचे कौतुक केले. या तिच्या महत्वाच्या योगदानामुळे महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावले गेले असल्याने महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख सरांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण भारतातून विविध शासकीय, निमशासकीय व स्वायतत्त्व विद्यापीठ कॉलेजेस मधून प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ती आपल्या यशाचे श्रेय श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री हर्षवर्धनजी देशमुख व सन्माननीय कार्यकारणी, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, डॉ. पवन टेकाडे, डॉ. अजय जावरकर, डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ. सतीश तिवारी, डॉ. पुष्पा जुनघरे, डॉ. रामावतार सोनी, डॉ. प्रतिभा काळे, डॉ. विनोद वासनिक, डॉ. प्रिया वर्भे, डॉ. सारिका डाखोडे, डॉ. स्वप्नील मोहोड, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना देते. तसेच तिला प्रा. विनय काळे, डॉ. प्रतिभा काळे, डॉ. अपुर्व काळे, डॉ. श्रीकांत शेगोकार, डॉ. प्रवीणा काळे व भाऊ विनम्र काळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.